# प्रकरण १
## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव:-**

या नियमांस महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ असे म्हणता येईल.

**२. व्याख्या :-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत,-

(अ)“अधिनियम” म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१

(अ-१) “स्थळप्रत” म्हणजे या नियमांच्या उपबंधानुसार मुद्रित करण्यात आलेल्या मतपत्रिकेला जोडलेली स्थळप्रत

(ब) “मतदार विभाग” यासंज्ञेचा अर्थ कलम १२ अन्वये ठरविण्यात आलेला जिल्हयाचा मतदार विभाग असा समजावा

(बब) “नमुना” यासंज्ञेचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना असा समजावा आणि तीत त्या नमुन्याच्या मराठी अनुवादाचा समावेश होतो

(क-एक) “मतदारांची यादी” म्हणजे कलम १३, पोटकलम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेली मतदारांची यादी

(क-दोन) “मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत” म्हणजे निवडणुकीत ज्यांना मतपत्रिका देण्यात आल्या आहेत अशा मतदारांच्या नावावर खूणा करण्याच्या प्रयोजनार्थ वेगळी ठेवलेली मतदारांच्या यादीची प्रत

(ड) “सरकारी सुटी” या संज्ञेचा अर्थ, परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ (सन १८८१ चा अधिनियम क्रमांक २६ ) याचे कलम २५ च्या प्रयोजनार्थ जो दिवस सरकारी सुटीचा दिवस असेल तो कोणताही दिवस किंवा राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी राज्य शासनाने जो दिवस म्हणून अधिसूचित केला असेल तो दिवस, असा समजावा.

(ड-अ) “राखीव जागा” म्हणजे कलम ५८ पोटकलम (१ ब) अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्या प्रतिनिधित्वासाठी कोणत्याही/ एखाद्या निर्वाचक गणामध्ये राखून ठेवण्यात आलेली जागा

(इ) “कलम” म्हणजे उक्त अधिनियमाचे कलम

(इ-एक) “राज्य निवडणूक आयोग” म्हणजे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-क च्या खंड (१) च्या तरतुदीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयुक्ताचा समावेश असलेला राज्य निवडणूक आयोग.

(फ) “मतदार” म्हणजे जिचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहे अशी व्यक्ती

(ग) वगळले.

## प्रकरण दोन

## मतदारांची यादी आणि सदस्य होण्यास लागणारी पात्रता

३. वगळण्यात आला

४. वगळण्यात आला

## प्रकरण तीन

## निवडणुकीचे कामकाज चालविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा

**५. निर्वाचन अधिकाऱ्याची नेमणूक :-**

जिल्हाधिकारी एक किंवा अनेक निर्वाचन गणांसाठी जो सरकारचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा किंवा शासकीय महामंडळाचा- मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येतो, अधिकारी असेल असा एक निर्वाचक अधिकारी म्हणून नियुक्त करील.

**६. सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याची नेमणूक :-**

(१) कोणताही निर्वाचन अधिकारी आपली कामे पार पाडीत असताना त्यास सहाय्य करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यास एका किंवा अनेक व्यक्तींची नेमणुक देखील करता येईल.

परंतु, अशी प्रत्येक व्यक्ती ही सरकारी किंवा स्थानिक प्राधिकरणाचा किंवा शासकीय महामंडळाचा -मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो- असा अधिकारी असेल.

(२) निर्वाचन अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून, प्रत्येक सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यास, निर्वाचन अधिकाऱ्याच्या कामांपैकी सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्याचा अधिकार असेल :

परंतु, नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याशी संबंधित असलेल्या कामांपैकी कोणतेही काम पार पाडण्यास, निर्वाचन अधिकारी, अनिवार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ झाला नसेल तर, कोणताही सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यास उक्त कामांपैकी कोणतेही काम पार पाडता येणार नाही.

**७. “निर्वाचन अधिकारी” या संज्ञेत, निर्वाचन अधिकाऱ्याची कामे पार पाडणा-या “सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचा” अंतर्भाव होणे :-**

नियम ६ च्या उपबंधास अधीन राहून, आणि तसेच संदर्भानुसार अन्य अर्थ आवश्यक नसेल तर, या निर्वाचन अधिकाऱ्यासंबंधी केलेल्या उल्लेखात सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यासंबंधीचा उल्लेख समाविष्ट आहे असे समजले जाईल.

**८. निर्वाचन अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य :-**

या नियमान्वये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, निवडणुकीचे कामकाज परिणामकारकरित्या चालविण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कृत्ये व गोष्टी करणे हे निर्वाचन अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

**९. मतदान केंद्रे :-**

निर्वाचन अधिकारी ज्या निर्वाचक गणांसाठी निवडणूक घ्यावयाची असेल त्या प्रत्येक निर्वाचक गणांसाठी पुरेशी असतील इतक्या मतदान केंद्राची व्यवस्था करील आणि तो, मतदानाच्या तारखेपूर्वी सात दिवसांहून अधिक उशीर होणार नाही अशा रीतीने, ती मतदान केंद्रे व ज्या क्षेत्रांसाठी ते स्थापन करण्यात येईल ती क्षेत्र (यात यापुढे ज्यांचा निर्देश मतदान क्षेत्र असा केला आहे) दर्शवणारी यादी प्रसिध्द करील.)

**१०. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नेमणूक :-**

(१) निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रासाठी एका मतदान केंद्राध्यक्षाची, आणि अशा मतदान केंद्राध्यक्षाला सहाय्य करण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा एक किंवा अनेक मतदान अधिकाऱ्याची नेमणूक करील, परंतु, निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेल्या किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तो नेमणार नाही :

परंतु, एखादा मतदान अधिकारी, मतदान केंद्रात अनुपस्थित असेल तर, त्या बाबतीत, मतदान केंद्राध्यक्षास, प्रथम निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत, मतदान अधिकारी म्हणून काम करण्यासाठी, अशा मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची, नेमणूक करता येईल. मात्र अशा रीतीने नेमलेली व्यक्ती ही, निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेली किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणारी व्यक्ती नसेल आणि तो निर्वाचन अधिकाऱ्यास तदनुसार कळवील.

(२) मतदान अधिकारी, त्यास मतदान केंद्राध्यक्षाने तसा निदेश दिला असेल तर, या नियमाखालील मतदान केंद्राध्यक्षाची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडेल.

(३) आजारपणामुळे किंवा इतर अनिवार्य कारणांमुळे मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रात अनुपस्थित राहणे भाग पडले असेल तर, त्याच्या अनुपस्थितीच्या कोणत्याही प्रसंगी त्याची कामे पार पाडण्यासाठी ज्यास निर्वाचन अधिकाऱ्याने पूर्वीच प्राधिकृत केले असेल असा मतदान अधिकारी अशी कामे पार पाडील.

(४) संदर्भावरुन, अन्यथा अर्थ आवश्यक नसेल तर, या नियमात मतदान केंद्राध्यक्षासंबंधी केलेल्या उल्लेखात, पोट-नियम(२) किंवा यथास्थिती पोट-नियम (३) अन्वये कोणतेही काम पार पाडण्याचा ज्यास अधिकारी मिळाला आहे अशा उक्त काम पार पाडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो असे समजले जाईल.

**११. मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्यः-**

मतदान केंद्रात सुव्यवस्था राखणे आणि केंद्रात मतदानाचे काम सुरळीतपणे चालू ठेवणे हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

**१२.नियंत्रण:-**

निर्वाचन अधिकारी, सहाय्यक निर्वाचन अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि या नियमांशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबतीत नेमलेल्या इतर सर्व व्यक्ती हया राज्य निवडणूक आयुक्ताच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली, अधिक्षणासाठी व नियंत्रणाखाली काम करतील.

## प्रकरण चार
## निवडणुकीचे कामकाज चालविणे

**१३. निवडणूकीची नोटीस देणे व तिचे निरनिराळे टप्पे ठरविणे:-**

(१) कलम ५७, पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी ज्यावेळी निवडणूक घ्यावयाची असेल त्यावेळी, राज्य निवडणूक आयोग, आदेशाद्वारे पुढील गोष्टी ठरवून देईल :

(अ) नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची शेवटची तारीख, वेळ व ठिकाण मात्र अशी तारीख ही मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी पंधरा दिवसांपेक्षा अधिक उशिराची नसेल आणि त्या दिवशी सरकारी सुटी येत असेल तर, त्या दिवसाच्या लगत पुढील ज्या दिवशी सरकारी सुटी नसेल अशा दिवसाची तारीख असेल

(ब) नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याची तारीख, वेळ व ठिकाण, मात्र अशी तारीख ही नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेच्या लगत पुढील तारीख असेल आणि त्या दिवशी सरकारी सुटी येत असेल तर, त्या दिवसाच्या लगत पुढील ज्या दिवसाच्या लगत पुढील ज्या दिवशी सरकारी सुटी नसेल अशा दिवसाची तारीख असेल.

(ब-१) वगळले.

(क) ज्या तारखेस आणि व ज्यावेळात मतदान घेण्यात येईल ती तारीख व ती वेळ

(ड) मतमोजणीची (सरकारी सुटीच्या किंवा सुट्टयांच्या दिवशी येईल. अशी नसणारी किंवा अशा नसणाऱ्या) तारीख किंवा तारखा आणि अशा तारखेस किंवा तारखांना मतमोजणी करण्याचे वेळ आणि ठिकाण)

परंतु, राज्य निवडणूक आयुक्ताला मतमोजणीची जागा उपलब्ध करुन देण्यास किंवा तिच्यात फेरफार करण्यास जिल्हाधिका-याला प्राधिकृत करता येईल.

(१-अ) त्यानंतर जिल्हाधिकारी, पोटनियम (१) अन्वये निश्चित करण्यात आलेला निवडणूक कार्यक्रम नमुना एकमध्ये प्रसिध्द करील.

(२) राज्य निवडणूक आयोगाच्या पूर्व मंजुरीने ते खेरीजकरुन, पोट-नियम(१) अन्वये निश्चित करण्यात आलेल्या तारीखा मतदान घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वीच्या सात दिवसात बदलण्यात येणार नाहीत.

(३) पोट-नियम(२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बाबतीत सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत होईल त्याबाबतीत त्यास, राज्य

निवडणूक आयोग या बाबतीत देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन राहून, पूर्वोक्तप्रमाणे ठरविलेल्या कोणत्याही तारखांमध्ये आदेशाद्वारे बदल करता येईल आणि जो कालावधी शासनातर्फे राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील दुखवटयाचा कालावधी म्हणून जाहीर करण्यात येईल अशा कोणत्याही कालावधीत, तो असा बदल करील. पहिल्या प्रकारात मोडणा-या प्रकरणी तो, सार्वजनिक हिताच्या संबंधात ज्या कारणाकरीता तारीख बदलण्यात आली असेल ती कारणे आदेशात नोंद करील.

या दोन्हींपैकी कोणत्याही प्रकरणी तो आदेशाची एक प्रत राज्य निवडणूक आयुक्तास ताबडतोब पाठवील आणि नियम १४, पोटनियम(१) खंड (अ)आणि (ब) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने तारखेतील बदलास प्रसिध्दी देईल.

(४) या नियमाच्या पोट-नियम (१) व (२) मध्ये असलेली कोणतीही गोष्ट, नियम ५१ अन्वये नव्याने मतदान घेण्यात येईल त्यावेळी लागू होणार नाही.

**१४. नियम १३ अन्वये काढलेला आदेश प्रसिध्द करण्याची रीत :-**

(१) नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेच्या पूर्वी वीस दिवसांहून अधिक उशिर होणार नाही अशा रितीने, नियम १३, पोट-नियम(१) अन्वये काढलेला आदेश

(अ) पंचायत समितीच्या कार्यालयात एखाद्या ठळक भागावर आणि तसेच ज्या तालुक्यातील किंवा महालात किंवा तहसिलीत निवडणूक घ्यावयाची असेल त्या तालुक्याचा किंवा महालाचा किंवा तहसिलीचा मामलेदार, तहसिलदार, किंवा महालकरी किंवा नायब तहसिलदार याच्या कार्यालयातील एखाद्या ठळक भागावर जिल्हाधिका-याकरवी लावण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(ब) जिल्हयामध्ये किंवा यथास्थिती तालुक्यामध्ये कोणतेही मराठी दैनिक किंवा साप्ताहिक वृत्तपत्र प्रसिध्द होत असेल तर अशा निदान एका दैनिकात किवा साप्ताहिकात जिल्हाधिकाऱ्याकरवी प्रसिध्द करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(क) ज्या निर्वाचक गणासाठी निवडणूक घ्यावयाची असेल त्या निर्वाचक गणातील प्रत्येक गावातील चावडीमध्ये किंवा पंचायतीच्या कार्यालयामध्ये किंवा जिल्हाधिकारी निवड करील अशा अन्य सरकारी इमारतीमध्ये जिल्हाधिकाऱ्याकरवी लावण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(२) जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने देखील नियम १३, पोटनियम (१) अन्वये दिलेला आदेश प्रसिध्द करण्याची व्यवस्था करता येईल.

**१५.उमेदवारांचे नामनिर्देशन करणे :-**

(१) कोणत्याही व्यक्तीसा एखाद्या निर्वाचक गणातून जागा भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट करता येईल, मात्र तो अधिनियमाच्या उपबंधान्व्ये त्या जागेवर निवडून देण्यास पात्र असावा.

(२) पोटनियम (१) अन्वये सादर करण्यात आलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र हे नमुना २ मध्ये संपूर्णपणे भरण्यात येईल :

परंतु, निशाणीसंबंधीचे प्रतिज्ञापन संपूर्णपणे भरण्यात कसूर करण्यात आली असेल किंवा ते संपूर्णपणे भरताना त्यात दोष राहून गेला असेल तर, त्यामुळे एखादा नियम, १९ पोटनियम (४) च्या अर्थानुसार महत्वाच्या स्वरुपाचा दोष घडला आहे असे समजण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही मतदाराने, मागणी केल्यावर त्यास निर्वाचन अधिकारी नामनिर्देशनपत्र पुरविल.

**१५-अ. राजकीय पक्ष/ आघाडी/ मोर्चा यांनी उभा केलेल्या उमेदवारांच्या नावांची सूचना देण्याकरीता प्राधिकृत केलेल्या व्यक्ती :-**

पंचायत समितीच्या कोणत्याही निवडणुकीकरीता उमेदवार उभे करणारा राजकीय पक्ष/आघाडी/मोर्चा अशा उमेदवारांची नावे नमुना २ब मध्ये कळविण्यासाठी अधिकृत केलेल्या व्यक्तींची माहिती नमुना २-अ मध्ये देईल.

**१६. नामनिर्देशनपत्र सादर करणे आणि वैध नामनिर्देशनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी:-**

(१) नियम १३, पोटनियम (१), खंड (अ) या अन्वये नेमलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी, प्रत्येक उमेदवार, स्वतः किंवा सूचकामार्फत, नियम १५ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने संपूर्णपणे भरलेले आणि त्या उमेदवाराची व सूचक म्हणून निर्वाचक गणातील एखाद्या मतदाराची सही असलेले नामनिर्देशनपत्र नियम १३ अन्वये काढलेल्या आदेशात निर्दिष्ट केलेल्या वेळात व त्या ठिकाणी निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील.

(२) या अधिनियमान्वये मतदार म्हणून कोणत्याही अनर्हतेच्या अधीन नसणाऱ्या व ज्या निर्वाचक गणातून उमेदवारास नामनिर्देशित केले असेल त्या निर्वाचक गणातील मतदारांच्या यादीत जिच्या नावाची नोंद केलेली असेल अशा व्यक्तीला सूचक म्हणून सही करता येईल.

(२-अ) ज्या निर्वाचक गणामध्ये राखीव जागा असेल त्या निर्वाचक गणामध्ये एखादा उमेदवाराने तो ज्या अनुसूचित जातींचा किंपर अनुसूचित जमातींचा किंवा नागरिकांच्या मागासवर्गाचा सदस्य असेल त्या विशिष्ट जातीचा किंवा जमातीचा निर्देश केलेले प्रतिज्ञापत्र त्याच्या नामनिर्देशनपत्रामध्ये समाविष्ट नसल्यास तो उमेदवार ती जागा भरण्यासाठी पात्र असल्याचे समजण्यात येणार नाही.

(२ब) राखीव जागेतून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने तो अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांच्या मागासवर्गाचा असल्याबाबतचे प्रतिज्ञापन दाखल करण्याखेरीज त्याच्या नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची खरी प्रत जोडली पाहिजे.

(२ ) निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती नामांकनपत्राच्या छाननीच्या वेळी जातीचे मूळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर करील.

(३) नामनिर्देशनपत्र सादर करण्यात आल्यावर, निर्वाचन अधिकारी, उमेदवार व त्याचा सूचक यांची नामनिर्देशनपत्रात समाविष्ट केलेली नावे व त्याचे क्रमांक ही कलम ५८, पोटकलम (१), खंड (ब) मध्ये निर्देशिलेल्या मतदारांच्या यादीत समाविष्ट केलेल्या नावाप्रमाणे व क्रमांकाप्रमाणेच आहेत याविषयी आपली खातरजमा करुन घेईल. या पोटनियमान्वये एखादे

नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात आले असेल तर, निर्वाचन अधिकारी त्याबद्दलची आपली कारणे त्यावर लिहून ठेवील आणि अशा प्रसंगी उमेदवार या नियमांच्या सर्व उपबंधांना अधीन राहून, नव्याने नामनिर्देशनपत्र स्वाधीन करील.

परंतु, निर्वाचन अधिकाऱ्याने, उक्त नावे किंवा क्रमांक यांच्या संबंधात नामनिर्देशनपत्रात करण्यात आलेली कोणतीही लिखाणाच्या स्वरुपाची किंवा तांत्रिक चूक, ती नावे किंवा क्रमांक कलम ५८, पोट-कलम१, खंड (ब) मध्ये निर्देशिलेल्या मतदाराच्या यादीत तत्सम नोंदीशी जुळती करण्यासाठी दुरुस्त करण्यास परवानगी देईल आणि आवश्यक असेल तेथे, कोणतीही लिखाणाच्या स्वरुपाची अथवा मुद्रणाच्या स्वरुपाची चूक दुर्लक्षित करील.

(३-अ) उमेदवार वेगळया निर्वाचक गणातील मतदार असेल अशा बाबतीत, त्या निर्वाचक गणातील मतदारांच्या यादीची किंवा तिचा संबंध्द भागाची प्रत किंवा मतदारांच्या अशा यादीतील संबंध्द नोंदींची एक प्रमाणित प्रत, ती नामनिर्देशनपत्राबरोबर दाखल करण्यात आलेली नसेल तर, छाननीच्या वेळी, निर्वाचन अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

(६) या नियमातील कोणत्याही तरतुदीमुळे, एकाच निर्वाचक गणातील निवडणुकीसाठी कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रांद्वारे नामनिर्दिष्ट करण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, एकाच निर्वाचक गणातील निवडणुकीसाठी कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने, चारहून अधिक नसतील इतकी नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येतील व निर्वाचन अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात येतील.

**१६-अ. अनामत रकमा :-**

उमेदवाराने एकशे पन्नास रुपये इतकी रोख रक्कम आणि ज्याबाबतीत उमेदवार अनुसूचित जातीमधील, अनुसूचित जमातींमधील किंवा नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्ती असेल अशाबाबतीत पस्तीस रुपये इतकी रक्कम निर्वाचन अधिकाऱ्याकडे अनामत ठेवल्याखेरीज किंवा अनामत ठेवण्याची व्यवस्था केल्याखेरीज, उमेदवार निर्वाचक गणामधून निवडणुकीसाठी योग्यरित्या नामनिर्देशित केलेला असल्याने मानण्यात येणार नाही :

परंतु असे की, उमेदवारास एकाच निर्वाचक गणामधून एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्राद्वारे निवडणुकीसाठी नामनिर्देशित करण्यात आले असेल अशाबाबतीत, या नियमान्वये त्याच्याकडून एकापेक्षा अधिक अनामत रकमा घेण्याची आवश्यकता असणार नाही.

**१६-ब. दोन किंवा अधिक मतदार विभागांसाठी नामनिर्दिष्ट केले जाण्याचा अधिकार :-**

एखाद्या जिल्हयात दोन किंवा अधिक मतदार विभागांसाठी निवडणुका घ्यावयाच्या असतील तर, अशा मतदार विभागांपैकी प्रत्येक विभागासाठी उमेदवार म्हणून कोणत्याही एका व त्याच व्यक्तीस ती अन्यथा योग्य रीतीने पात्र असल्यास, नामनिर्दिष्ट करता येईल.

**१७. निवडणुकीसाठी निशाणी :-**

(१) कोणत्याही निर्वाचक गणातील निवडणुकीतील उमेदवारांना जी कोणतीही निशाणी निवडता येईल ती निशाणी आणि ज्या निर्बधांना अधीन राहून अशा निशाणीची निवड करता येईल ते निर्बंध राज्य निवडणूक आयोग **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिध्द करुन,निर्दिष्ट करील :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, त्यास राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या निशाण्यांच्या यादीत कोणत्याही आणखी निशाणीची भर घालण्याचा अधिकार असेल आणि तो अशा रीतीने चिन्हांच्या यादीत भर घातल्याबद्दल राज्य निवडणूक आयोगास ताबडतोब कळवील.

(२) ज्याबाबतीत कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे स्वाधीन केली असतील किंवा त्याच्यावतीने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे स्वाधीन करण्यात आली असतील त्याबाबतीत, प्रथमतः स्वाधीन करण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रात, निशाणीविषयी करुन दिलेले प्रतिज्ञापन नियम २१ अन्वये विचारात घेण्यात येईल मग असे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात आलेले असो किंवा नसो-तसेच याबाबतीत निशाणीच्या प्रतिज्ञापत्र विषयीची इतर कोणतीही नामनिर्देशनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

**१८. नामनिर्देशनासंबंधी नोटीस आणि छाननी करण्याचे ठिकाण व वेळ :-**

नियम १६, पोटनियम (१) अन्वये नामनिर्देशनपत्र मिळाल्यावर, निर्वाचन अधिकारी, ते नामनिर्देशनपत्र स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना, अशा नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेला दिवस, वेळ व ठिकाण ही कळविल आणि त्याने अशा नामनिर्देशनपत्रांवर त्याच्या अनुक्रमांकाची नोंद करुन त्यावर, ज्या तारखेस व ज्यावेळी ते त्याच्या स्वाधीन करण्यात आले ती तारीख व ती वेळ नमूद करणारे एक प्रमाणपत्र देईल व त्यावर आपली सही करील, आणि तदनंतर तो शक्य होईल तितक्या लवकर, आपल्या कार्यालयातील एखाद्या ठळक जागी, नामनिर्देशनासंबंधीची एक नोटीस चिकटविण्याची व्यवस्था करील. अशा नोटिशीत, उमेदवार व नाव सुचविणारी व्यक्ति अशा दोन्हीही व्यक्तिसंबंधीचा तपशिल देण्यात यईल, मात्र असा तपशिल हा, नामनिर्देशनपत्रात अशा व्यक्तीसंबंधी जो तपशील अंतर्भूत करण्यात आला असेल त्या तपशिलाप्रमाणेच असेल.

**१९.नामनिर्देशनाची छाननी करणे :-**

(१) नामनिर्देशनाची छाननी करण्यासाठी नियम १३ अन्वये निश्चित केलेल्या तारखेस उमेदवार, त्याचे निवडणूक प्रतिनिधी, प्रत्येक उमेदवाराचे नाव सुचविणारी एक व्यक्ती आणि प्रत्येक उमेदवाराने योग्यरित्या लेखी प्राधिकृत केलेली एक इतर व्यक्ती-परंतु यां व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती नव्हे - यांना नियम १३ अन्वये याबाबतीत ठरवून दिलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहता येईल आणि निर्वाचन अधिकारी, त्यांना नियम १६, पोट-नियम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याच्या स्वाधीन करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करण्यास त्यांना सर्व वाजवी सोयी उपलब्ध करुन देईल.

(२) त्यानंतर निर्वाचन अधिकारी, अशा नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनासंबंधी जे कोणतेही आक्षेप घेण्यात येतील त्या सर्व आक्षेपांचा निर्णय देईल

आणि त्यास, अशा आक्षेपावरुन किंवा स्वतः होऊन आणि त्यास जी कोणतीही संक्षिप्त चौकशी करणे आवश्यक वाटेल ती संक्षिप्त चौकशी केल्यानंतर, पुढीलपैकी कोणत्याही कारणावरुन कोणतेही नामनिर्देशन नामंजूर करता येईल, ती कारण अशी :

(अ) अधिनियमान्वये, किंवा तदनुसार जागा भरण्यासाठी निवडून येण्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात आले आहे

(ब) नाव सुचविणाऱ्या व्यक्तीस नामनिर्देशनपत्रांवर सही करण्याच्या कारणासाठी अपात्र ठरविले आहे,

(क) नियम १६ किंवा १६-अ च्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात कसूर करण्यात आली आहे,

(ड) उमेदवार किंवा नाव सुचविणाऱ्या व्यक्तीची नामनिर्देशनपत्रावरील सही ही त्याची खरीखुरी सही नाही.

(३) त्या उमेदवारास ज्या नामनिर्देशनपत्राच्या संबंधात कोणतीही नियमबाहयता राहून जाणार नाही अशा कोणत्याही दुसऱ्या नामनिदर्शनपत्राद्वारे योग्यरित्या नामनिर्दिष्ट करण्यात आलेले असेल तर, नामनिर्देशनपत्राच्या संबंधातील कोणत्याही नियमबाहयतेच्या कारणावरुन कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन नामंजूर करण्यास पोटकलम (२) चे खंड (क) किंवा (ड) यांतील कोणत्याही उपबंधांवरुन अधिकार देण्यात आला आहे, असे समजण्यात येणार नाही.

(४) महत्वाच्या स्वरुपाचा नसेल अशा कोणत्याही दोषावरुन निर्वाचन अधिकारी कोणतेही नामनिर्देशनपत्र नामंजूर करणार नाही.

(५) निर्वाचन अधिकारी, नियम १३, पोटनियम (१), खंड (ब) अन्वये याबाबतीत नेमलेल्या तारखेस छाननी करण्याचे काम करील आणि छाननी करण्याच्या कामास दंग्यामुळे किंवा उघड अशा, हिंसात्मक कृत्यामुळे किंवा निर्वाचन अधिकाऱ्याच्या आवाक्याबाहेरीत कारणामुळे व्यत्यय आला नसेल किंवा अडथळा निर्माण झाला नसेल तर, निर्वाचन अधिकारी असे छाननीचे काम पुढे ढकलण्यास परवानगी देणार नाही :

परंतु, निर्वाचन अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप घेतला असेल किंवा असा आक्षेप कोणत्याही व्यक्तीने उपस्थित केला असेल तर त्याबाबतीत, अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवारास लगत पुढील दिवसाहून उशीर होणार नाही इतका वेळ देता येईल आणि ज्या तारखेपर्यन्त असे कामकाज पुढे ढकलण्यात आले असेल त्या तारखेस निर्वाचन अधिकारी आपल्या निर्णयाची नोंद करील.

(६) निर्वाचन अधिकारी प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्वीकारल्याबद्दल किंवा नामंजूर केल्याबद्दल आपला निर्णय लिहून ठेवील आणि नामनिर्देशन नामंजूर करण्यात आले असेल तर, तो अशा रीतीने नामनिर्देशन नामंजूर केल्याबद्दलच्या आपल्या कारणाचे संक्षिप्त निवेदन लेखी नोंदवील.

(६-अ) या नियमाच्या प्रयोजनांसाठी, उमेदवारास अपात्र असल्याचे सिध्द करण्यात आले नसेल तर संबध्द निर्वाचक गणातील मतदार यादीमध्ये केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत सादर करणे

हा, त्या नोंदीमध्ये नाव असलेल्या कोणत्याही मतदारांच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याच्या अधिकाराबाबत निर्णायक पुरावा असेल.

(७) सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आल्यावर आणि त्यांचा स्वीकार करण्यात आला आहे किंवा ती नामंजूर करण्यात आले आहेत याविषयी निर्णय नमूद केल्यानंतर तात्काळ निर्वाचन अधिकारी, नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून, ज्याची नामनिर्देशने स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची एक यादी तयार करील व अशी यादी आपल्या सूचनाफलकावर, ती यादी ज्या तारखेस व ज्या वेळी लावली ती तारीख व वेळ त्यावर नमूद करुन लावील.

**१९-अ. अपील :-**

(१) निर्वाचन अधिकाऱ्याच्या नामनिर्देशनपत्र स्वीकारणाऱ्या किंवा फेटाळणाऱ्या निर्णयामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही उमेदवारास त्या निर्णयावर, नियम १९, पोटनियम (७) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्याने स्वीकारलेल्या उमेदवारांची नावे असणारी नोटीस सूचना-फलकावर लावल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या मुदतीच्या आत, पंचायत समितीचे क्षेत्र ज्या जिल्हयामध्ये असेल त्या जिल्हयाच्या जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल आणि तो उमेदवार सामान्यपणे त्याच दिवशी निर्वाचन अधिकाऱ्यास अपिलविषय विनंती अर्जाची एक प्रत व त्यास स्वतःस वगळून ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली असतील अशा उमेदवारांच्या संख्येइतक्या विनंती अर्जाच्या प्रती पुरवील.

(२) निर्वाचन अधिकारी, पोट-नियम (१) अन्वये अपिलाच्या प्रती मिळाल्यावर, ताबडतोबः

(अ)आपल्या सूचनाफलकावर नमुना २-क मधील नोटीस प्रसिध्द करील व तिच्याबरोबर अशी नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा जर तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असेल तर, त्याच्या लगतनंतरच्या सरकारी सुटीचा दिवस नसेल अशा दिवशी जिल्हा न्यायालयासमोर अपिलाच्या सुनावणीस प्रारंभ होईल आणि अपीलविषयक विनंती अर्जाची प्रत निर्वाचन अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे असे निवेदन त्या सूचना-फलकावर लावून प्रसिध्द करील.

(ब) त्याच्याकडे सादर केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रापैकी प्रत्येक नामनिर्देशनपत्राची प्रत व त्यावर त्याने नमूद केलेल्या निर्णयाची प्रत आणि त्या निर्वाचन अधिकाऱ्यास योग्य वाटतील असे संबध्द कागदपत्र जिल्हा न्यायालयाकडे पाठवील.

(३) उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने केलेल्या अर्जावरुन, निर्वाचन अधिकारी, अर्जदारास, नामनिर्देशनपत्र स्वीकारणाऱ्या किंवा फेटाळणा-या निर्णयाची प्रत व त्याने नमूद केलेल्या कारणाच्या निवेदन ताबडतोब पुरवील.

(४) या नियमान्वयेच्या प्रत्येक अपिलामध्ये, अपीलकार, निर्वाचन अधिका-याने ज्यांची नामनिर्देशने स्वीकारली आहेत अशा (त्यास स्वतःस वगळून) सर्व उमेदवारांना उत्तरवादी म्हणून सामील करुन घेईल.

(५) पोट-नियम(२), खंड (अ) अन्वये निर्वाचन अधिका-याच्या सूचना फलकावर लावलेली नोटीस ही या नियमान्वये अपील सादर केल्याबद्दल आणि जिल्हा न्यायालयापुढे अपिलाच्या सुनावणीस ज्या तारखेस प्रारंभ होईल त्या तारखेबद्दल पुरेशी नोटीस असल्याचे

मानण्यात येईल आणि अपीलकाराला किंवा उत्तरवादीला इतर कोणत्याही नोटीस देण्याची आवश्यकता असणार नाही आणि उक्त तारीखेस अप्रतिवाद्य सुनावणीसाठी अपिल निश्चित केले असल्याचे मानण्यात येईल.

(६) अपिलाच्या प्रयोजनासाठी जिल्हा न्यायालयास या नियमामध्ये उपबंधित केले असेल ते खेरीजकरुन, दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकार वापरता येईल.

(७) या नियमान्वये प्रत्येक अपिलाची सुनावणी प्रत्येक दिवशी करण्यात येईल आणि ते जिल्हा न्यायालयाकडून शक्य जितक्या शीघ्रतेने निकालात काढण्यात येईल व त्याचा निर्णय ताबडतोब निर्वाचन अधिकाऱ्यास कळविण्यात येईल.

(८) या नियमान्वयेच्या अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय व केवळ अशा निर्णयास अधीन राहून, निर्वाचन अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकारणारा किंवा फेटाळणारा निर्णय हे अंतिम व निर्णायक असतील व त्यावर कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कलम २७ पोटकलम (२) यामध्ये निर्देशिलेल्या न्यायाधिशासमोर आक्षेप घेता येणार नाही.

**२०. उमेदवारी मागे घेणे :-**

(१) कोणत्याही उमेदवारास, -

(अ) नियम १९-अ अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल अशाबाबतीत, नियम १९-अ, पोटनियम ( १) यामध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर, दुसऱ्या दिवशी किंवा तो सरकारी सुटीचा असेल तर, त्याच्या लगतनंतरच्या, सरकारी सुटीच दिवस नसलेल्या दिवशी, आणि

(ब) असे अपील करण्यात आलेले असेल अशाबाबतीत जिल्हा न्यायालयाचा निर्णय दिल्याच्या दिवसानंतरच्या दुसऱ्या दिवशी किंवा असा दुसरा दिवस सरकारी सुटीचा दिवस असेल तर, त्याच्या लगतनंतरच्या, सरकारी सुटीचा नसेल अशा दिवशी

त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

(२) उमेदवारी मागे घेण्यासाठी पोटनियम (१) अन्वये निश्चित केलेल्या दिवशी दुपारी तीन वाजण्यापूर्वी नोटीस निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल.

(३) अशी नोटीस एकतर उमेदवार स्वतः देईल किंवा ती अशा उमेदवाराचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तिमार्फत किंवा त्याने याबाबतीत ज्यास लेखी प्राधिकृत केले आहे अशा निवडणूक प्रतिनिधीमार्फत देखील देता येईल.

(४) जिने पोटनियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस अशी नोटीस रद्द करण्याची परवानगी मिळणार नाही.

(५) उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या नोटीशीच्या खरेपणाबद्दल आणि तसेच ती पोटनियम (१) अन्वये स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबत आपली खात्री करुन घेतल्यावर निर्वाचन अधिकारी, आपल्या कार्यालयातील सूचना-फलकावर अशी नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

**२१.निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे :-**

(१) नियम २० अन्वये ज्या मुदतीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत समाप्त झाल्यावर, निर्वाचन अधिकारी, ताबडतोब निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची, म्हणजे, ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिमरित्या स्वीकारण्यात आली असतील व ज्यांनी उक्त मुदतीच्या आत आपली उमेदवारी मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची एक यादी तयार करील व ती नमुना ३ मध्ये प्रसिध्द करील.

(२) पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन राहून, उक्त यादीत निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे देण्यात येतील, तसेच नामनिर्देशनपत्रात उमेदवारांनी दिलेले त्यांचे पत्तेदेखील देण्यात येतील.

(३) पोटनियम (१) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत नमुना ३ मध्ये दिलेला तपशील नमूद करण्यात येईल आणि निर्वाचन अधिकारी, निदेशित करुन देईल अशा भाषेत किंवा भाषांत अशी यादी तयार करण्यात येईल.

(४) ज्या उमेदवारांना आडनावे असतील अशा उमेदवारांच्या आडनावानुसार आणि इतर उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या खुद्द नावानुसार पोट-नियम (२) यात उल्लेखिलेला वर्णानुक्रम ठरविण्यात येईल.

(५) जर अशी यादी एकापेक्षा अधिक भाषांत तयार करण्यात आली असेल तर, त्यातील उमेदवारांची नावे, त्या भाषांपैकी जी भाषा निर्वाचन अधिकारी निर्देशित करील त्या भाषेच्या लिपीच्या वर्णानुक्रमानुसार लिहिण्यात येईल.

(६) जेव्हा मतदान घेणे आवश्यक असेल तेव्हा, निर्वाचन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या नामनिर्देशनपत्रात दर्शविण्यात आलेल्या त्यांच्या निशाणीच्या पसंतीबाबत विचार करील, आणि राज्य निवडणूक आयोगाने याबाबतीत दिलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष निदेशांना अधीन राहून, तो-

(अ) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमदेवारास व्यवहार्य असेल तेथवर त्याच्या पसंतीनुसार वेगवेगळी निशाणी वाटून देईल आणि

(ब) निवडणूक लढविणाऱ्या एकाहून अधिक उमेदवारांनी एकाच निशाणीबाबत आपली पसंती दर्शविली असेल तर, त्याबाबतीत, अशा उमेदवारांपैकी कोणत्या उमेदवारास अशी निशाणी वाटून द्यावयाची ते चिठ्ठया टाकून ठरवील.

(७) निर्वाचन अधिका-याने उमेदवारांमध्ये केलेली कोणत्याही निशाणीची वाटणी ही अखेरची असेल, मात्र अशी वाटणी राज्य निवडणूक आयोगाने याबाबतीत दिलेल्या कोणत्याही निदेशांशी विसंगत नसेल आणि ती अशाप्रकारे विसंगत असेल तर, अशाबाबतीत जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने त्या वाटणीची फेरतपासणी करता येईल.

(८) प्रत्येक उमेदवारास वाटून देण्यात आलेल्या निशाणीबद्दल प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस माहिती देईल आणि त्या निशाणीचा एक नमुना त्यास निर्वाचन अधिकाऱ्याकडून पुरविण्यात येईल.

**२२. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे:-**

निर्वाचन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार केल्यानंतर ताबडतोब अशा यादीची आपल्या कार्यालयातील सूचना-फलकावर लावण्याची व्यवस्था करील तसेच तो अशा यादीची एक प्रत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी प्रत्येक उमेदवाराला आणि मागणी करण्यात आली असता, ती त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस देखील पुरवील.

## प्रकरण पाच
## उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी

**२३. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करणे किंवा अशी नेमणूक रद्द करणे:-**

(१) एखाद्या उमेदवारास, निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करावयाची असेल तर, पोटनियम (३) च्या उपबंधांस अधीन राहून, अशी नेमणूक ही नामनिर्देशनपत्र स्वाधीन करण्याच्या वेळी किंवा निवडणूकीपूर्वी कोणत्याही वेळी नमुना ४ अनुसार करता येईल.

(२) उमेदवारास, कोणत्याही वेळी, लेखी निवेदनावर स्वत: सही करुन व असे निवेदन निर्वाचन अधिकाऱ्याकडे सादर करुन निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करता येईल. अशारीतीने नेमणूक रद्द करण्याचा निर्णय हा ज्या तारखेस अशी नेमणूक रद्द करण्यासंबंधीचे असे निवेदन दाखल करण्यात आले असेल त्या तारखेपासून अंमलात येईल. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक अशा रीतीने रद्द केली असेल किंवा निवडणुकीच्या मुदतीपूर्वी किंवा अशी मुदतीत निवडणूक प्रतिनिधी मरण पावला तर, पोटनियम (१) च्या उपबंधानुसार उमेदवारास नवीन निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

(३) पंचायत समितीच्या कोणत्याही निवडणुकीत निवडून येण्यासाठी किंवा अशा निवडणुकीत मतदान करण्यासाठी जिला नियम ५८ व कलम २८ अन्वये त्यावेळी अपात्र ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, ज्या मुदतीपर्यन्त तिचे अशा रीतीने अपात्र राहणे चालू असेल त्या मुदतीत निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही.

**२४. मतदान प्रतिनिधीची नेमणूक :-**

(१) ज्या निवडणुकीत मतदान घ्यावयाचे असेल अशा एखाद्या निवडणुकीसाठी, निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवारास, अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, प्रत्येक मतदान केंद्रासाठी अशा उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी म्हणून एका प्रतिनिधीची व दोन सहाय्यकारी प्रतिनिधींची नेमणूक करता येईल. अशी नेमणूक नमुना ५ मधील लेखी पत्राद्वारे येईल व त्यावर उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधी सही करील व अशा नेमणुकीसंबंधीचे पत्र निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवून त्यास अशा नेमणुकीसंबंधी नोटीस देईल.

(२) तसेच, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी असे नेमणूकपत्र मतदान प्रतिनिधीच्या स्वाधीन करील, आणि मतदान प्रतिनिधी मतदान घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस ते केंद्राध्यक्षास सादर करील, आणि त्याच्या समक्ष अशा पत्रात समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञापनावर सही करील. मतदान केंद्राध्यक्षा, त्यास सादर करण्यात आलेले पत्र त्याच्या

अभिरक्षेत ठेवून जाईल. कोणत्याही मतदान प्रतिनिधीने या पोटनियमाच्या उपबंधांचे पालन केले नाही तर त्यास मतदान केंद्रात कोणतेही काम करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**२५. मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक करणे:-**

(१) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस नमुना ५ मधील पत्राद्वारे, अशा उमेदवाराचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी आठपेक्षा अधिक असणार नाहीत इतके प्रतिनिधी नेमता येतील. अशा पत्राच्या दोन प्रती काढण्यात येतील व त्यावर उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधी सही करील .

(२) मतमोजणी सुरु होण्यापूर्वी, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, पोटनियम(१) यात उल्लेखिलेले नेमणुकीसंबंधीचे पत्र निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवून अशा मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबत त्या निर्वाचन अधिकाऱ्यास नोटीस देईल.

(३) तसेच, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी अशा नेमणूकीच्या पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीच्या स्वाधीन करील आणि तो मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या तारखेस अशी दुसरी प्रत निर्वाचन अधिकाऱ्यापुढे सादर करील व त्याच्या समक्ष अशा पत्रात समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञापनावर सही करील. निर्वाचन अधिकारी त्यास अशा रीतीने सादर करण्यात आलेली दुसरी प्रत आपल्या अभिरक्षेत ठेवील. कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीने या पोट-नियमाच्या उपबंधांचे पालन केल्याशिवाय, त्यास मतमोजणी करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी कोणतेही काम पार पाडण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**२६. मतदान प्रतिनिधी मरण पावल्यास त्याची नेमणूक रद्द करणे :-**

(१) उमेदवारास, स्वतः सही करुन सादर केलेल्या लेखी प्रतिज्ञापनाद्वारे मतदानास सुरुवात होण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करता येईल.

(२) असे प्रतिज्ञापन-

(अ) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी सात दिवसांहून कमी नाही इतक्या अगोदर नेमणूक रद्द करण्यात आली असेल तर, निर्वाचन अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, निर्वाचन अधिकाऱ्याकडे किंवा ज्या मतदान केंद्रात काम करण्यास अशा मतदान प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली असेल त्या मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षाकडे सादर करण्यात येईल.

(३) मतदान पूर्ण होण्यापूर्वी एखाद्या उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी मरण पावला असेल तर, आणि:-

(अ) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी सात दिवसांहून कमी नाही इतक्या अगोदर नेमणूक रद्द करण्यात आली असेल तर, निर्वाचन अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, निर्वाचन अधिकाऱ्याकडे किंवा ज्या मतदान केंद्रात काम करण्यास अशा मतदान प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली असेल त्या मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षास सादर करण्यात येईल.

(४) जेव्हा जेव्हा पोट-नियम(१) किंवा (२) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्यास कोणतेही प्रतिज्ञापन किंवा प्रतिवृत्त मिळेल, तेव्हा तेव्हा तो ताबडतोब, असे प्रतिज्ञापन किंवा यथास्थिती प्रतिवृत्त ज्या मतदान केंद्रात काम करण्यास अशा मतदान प्रतिनिधींची नेमणूक केली होती त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाकडे लेखी कळवील.

(५) जेव्हा जेव्हा पोट-नियम (१) अन्वये एखाद्या मतदान प्रतिनिधीचे नेमणूक रद्द करण्यात आली असेल किंवा मतदान समाप्त होण्यापूर्वी अशा मतदान प्रतिनिधीचा मृत्यू घडून आला असेल तेव्हा, उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस मतदान बंद करण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी नियम २४, पोट-नियम (१) च्या उपबंधानुसार नवीन मतदान प्रतिनिधींची नेमणूक करता येईल :

परंतु, नवीन मतदान प्रतिनिधींच्या नेमणुकीसंबंधी पाठवावयाचे नेमणूकपत्र हे,-

(अ) जर अशी नेमणूक मतदान घेण्यास सुरुवात होण्यापूर्वी सात दिवसांहून कमी नाही इतक्या अगोदर केली असेल तर, ते निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल, आणि

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, ते निर्वाचन अधिकाऱ्याकडे किंवा ज्या मतदान केंद्रावर काम करण्यास अशा नवीन मतदान प्रतिनिधींची नेमणूक केली असेल त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाकडे पाठविण्यात येईल.

(६) नियम २४, पोट-नियम (२) चे उपबंध, ज्याप्रमाणे नियम २४, पोट-नियम (१) अन्वये नेमलेल्या मतदान प्रतिनिधींच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे ते पोट-नियम (५) अन्वये नेमलेल्या मतदान प्रतिनिधींच्या संबंधात लागू होतील.

**२७. मतमोजणी प्रतिनिधी मरण पावल्यास त्याची नेमणूक रद्द करणे :-**

(१) मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी, कोणत्याही वेळी उमेदवारास, त्याने सही केलेल्या लेखी प्रतिज्ञापनाद्वारे मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक रद्द करता येईल. असे प्रतिज्ञापन निर्वाचन अधिकाऱ्यास देण्यात येईल.

(२) जर मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वी उमेदवाराचा मतमोजणी प्रतिनिधी मरण पावला तर, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी निर्वाचन अधिकाऱ्यास अशा मृत्यूबद्दल ताबडतोब लेखी कळवील.

(३) पोट-नियम (१) अन्वये मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक रद्द करण्यात आली असेल किंवा मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वी मतमोजणी प्रतिनिधी मरण पावला तर, उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस नियम २५, पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या रीतीने नवीन मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

(४) नियम २५, पोटनियम (२) व (३) चे उपबंध ज्याप्रमाणे नियम २५, पोटनियम (१) अन्वये नेमलेल्या मतमोजणी प्रतिनिधीच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणेच ते पोट-नियम (३) अन्वये नेमलेल्या मतमोजणी प्रतिनिधींच्या संबंधात लागू होतील.

## प्रकरण ६
## निवडणूकीची सर्वसाधारण कार्यपध्दती

**२८.	मतदानापूर्वी उमेदवार मरण पावणे :-**

निवडणूक लढविणारा उमेदवार जर मरण पावला आणि त्याच्या मृत्युचे प्रतिवृत्त निर्वाचन अधिका-यास मतदान सुरु होण्यापूर्वी मिळाले तर, असा निर्वाचन अधिकारी, उमेदवाराच्या मृत्युबाबत त्याची खात्री झाल्यानंतर, मतदानासंबधी प्रत्यादेश देईल व ती गोष्ट राज्य निवडणूक आयुक्ताला व जिल्हाधिका-याला कळविल आणि त्या निवडणूकीच्या संबंधातील कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरु करण्यात येईल.

परंतु,

(एक) मतदानासंबधी प्रत्यादेश देण्याच्यावेळी जी व्यक्ती निवडणूक लढविणारी उमेदवार होती अशा व्यक्तीच्या बाबतीत आणखी नामनिर्देशन पत्राची आवश्यकता असणार नाहीः आणि

(दोन) मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्यापूर्वी जिने नियम २०, पोट-नियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दलची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, मतदानासंबंधी असा प्रत्यादेश दिल्यानंतर निवडणुकीकरीता उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट केली जाण्यास अपात्र असणार नाही.

**२९.	बिनविरोध निवडणुका :-**

नियम २०, पोट-नियम (१), अन्वये ज्या कालावधीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल तो कालावधी संपल्यानंतर एखाद्या निर्वाचक गणामध्ये, याचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले आहे असा केवळ एकच उमेदवार असेल तर, निर्वाचन अधिकारी, तो उमेदवार त्या जागेसाठी रीतसर निवडून आल्याचे ताबडतोब जाहीर करील आणि नमुना ५-अ मधील प्रतिज्ञापन पूर्ण करुन व प्रमाणित करुन त्याच्या सही केल्याच्या प्रती, शक्य तितक्या लवकर, राज्य निवडणूक आयोगाकडे आणि जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

**३०.	लढविलेल्या निवडणुका :-**

नियम २९ द्वारे समाविष्ट केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त इतर प्रकरणांमध्ये मतदान घेण्यात येईल.

**३०-अ. अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या किंवा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाच्या सदस्यांची, त्या जातींसाठी, जमातीसाठी किंवा त्या वर्गासाठी राखीव नसलेल्या जागा धारण करण्याची पात्रता :-**

शंकेचे निरसन करण्यासाठी याद्वारे, असे जाहीर करण्यात येत आहे की, अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या किंवा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाचा सदस्य हा, या अधिनियमान्वये अशा जागा धारण करण्यास अन्यथा पात्र असल्यास, तो त्या जातीच्या, जमातींच्या किंवा वर्गाच्या सदस्यांसाठी राखीव नसलेल्या जागा धारण करण्यास अपात्र असणार नाही.

## प्रकरण ७

## मतदान विभागातील मतदान व मतनोंदणी

**३१.निवडणुकीतील मतनोंदणीची रीत :-**

मतदान घेण्यात येईल अशा प्रत्येक निवडणुकीत यात यापुढे दिलेल्या रीतीने गुप्त मतदान पध्दतीने मते देण्यात येतील आणि प्रतिनिधीमार्फत मते घेतली जाणार नाहीत.

**३१-अ निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारांकडून येणाऱ्या सूचना :-**

जर एखाद्या मतदार गणात निवडणुकीचे काम करणारा मतदार हा त्याच मतदार गणातील मतदार असल्यामुळे व त्या मतदार गणातील निवडणुकीत टपालाने मतदान न करता जातीने मतदान करण्याची त्याची इच्छा असेल तर, मतदानाच्या निदान चार दिवस आधी किंवा निर्वाचन अधिकारी परवानगी देईल अशा त्यापेक्षा कमी कालावधीत निर्वाचन अधिका-यास प्राप्त होईल अशा बेताने निर्वाचन अधिकाऱ्याकडे तो नमुना ५ब मध्ये अर्ज पाठवील आणि जर तो अर्जदार अशा प्रकारचा शासकीय कर्मचारी आहे आणि त्याच मतदार गणातील निवडणूक कामावरील मतदार आहे अशी निर्वाचन अधिकाऱ्याची खात्री पटली, तर तो-

(अ) अर्जदाराला नमुना ५-क मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र देईल :

(ब) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीवर त्याच्या नावापुढे त्याला निवडणूक कार्य प्रमाणपत्र दिले आहे असे दर्शविण्यासाठी निकाप्र असे लिहिल आणि

(क) ज्या मतदान केंद्रावर तो मतदान करण्यास अन्यथा पात्र झाला असता अशा मतदान केंद्रावर त्याला मतदान करण्यास परवानगी दिली जात नाही याची खात्री करुन घेईल.

**३२.मतपेटी :-**

प्रत्येक मतपेटी ही, राज्य निवडणूक आयोगाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने मान्य केलेल्या नमुन्याची असेल.

**३३.मतपत्रिकेचा नमुना:-**

(१) प्रत्येक मतपत्रिकेला स्थळप्रत जोडलेली असेल व उक्त मतपत्रिका आणि स्थळप्रत ही नमुना ६ मध्ये मुद्रित करण्यात येतील.

(२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत ज्या क्रमाने उमेदवारांची नावे असतील त्याच क्रमाने ती मतपत्रिकावर लिहिण्यात येतील.

(३) जर दोन किंवा अधिक उमेदवार एकच नाव धारण करीत असतील तर, त्यांचा व्यवसाय किंवा राहण्याचे ठिकाण लिहून किंवा इतर रितीने त्यांच्यात फरक करण्यात येईल.

**३४. मतदान केंद्रावरील व्यवस्था:-**

(१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर प्रामुख्याने दिसतील अशाप्रकारे खालील गोष्टी प्रदर्शित करण्यात येतील:-

(अ) ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना त्या मतदान केंद्रात आणि मतदान केंद्रात एकापेक्षा अधिक मतदान मंडप (बूथ) असतील तर, अशा मतदान मंडपांपैकी प्रत्येक मंडपात मत देण्याचा

हक्क असलेले मतदान क्षेत्र आणि अशा मंडपास नेमून देण्यात आलेल्या मतदाराचा तपशील विनिर्दिष्ट करणारी नौटीसः आणि

(ब) निवडणूक लढवणा-या उमेदवाराच्या यादीची एक प्रत

(२) प्रत्येक मतदान केंद्रात कोणाला न दिसेल अशा रीतीने मतदारांना आपले मत देता येईल असे एक किंवा अधिक मतदान कक्ष तयार केलेले असतील.

(३) निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रात, पुरेशा मतपेटया, मतपत्रिका, ज्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रातील मतदाराना अशा मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क असेल अशा मतदान क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधातील मतदारांच्या यादीमधील संबध्द भागाच्या प्रती, मतपत्रिकांवर विशिष्ट खुणेचा ठसा उमटविण्याची साधने आणि मतदाराला मतपत्रिकेवर खूण करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू पुरवील. तसेच निर्वाचन अधिकारी, अशा मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधने व सामग्री देखील प्रत्येक मतदान केंद्रास पुरवील.

**३५. मतदान केंद्रात प्रवेश :-**

मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही एकावेळी मतदान केंद्रात प्रवेश द्यावयाच्या मतदारांची संख्या नियमित करील आणि खालील व्यक्तीखेरीज इतर सर्व व्यक्तींना तेथून बाहेर काढील:-

(अ) मतदान अधिकारी

(ब) निवडणुकीच्या संबंधात कामावर हजर असलेले लोकसेवक

(क) जिल्हाधिकाऱ्याने किंवा निर्वाचन अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व नियम २४ च्या उपबंधास अधीन राहून प्रत्येक उमेदवाराचा एक-एक मतदान प्रतिनिधी

(इ) मतदाराच्या सोबत असलेले कडेवरील मूल

(फ) जो मदतीशिवाय हालचाल करु शकत नाही अशा आंधळया किंवा अपंग मतदारासोबत असलेली व्यक्ती, आणि

(ग) नियम ३६-अ, पोट-नियम (२) अन्वये निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष नेमील अशा किंवा नियम ३७, पोट-नियम (१) अन्वये मतदान केंद्राध्यक्ष कामावर लावील अशा इतर व्यक्ती.

**३६.मतदानासाठी मतपेटया तयार करणेः-**

(१) मतपेटया सुरक्षित करण्याकरीता जेव्हा एखादी कागदाची मोहोर उपयोगात आणली असेल तेव्हा मतदान केंद्राध्यक्ष ती कागदी मोहोर लावील व त्यावर आपली स्वतःची सही करील व तेथे हजर असलेल्या मतदान प्रतिनिधींपैकी ज्यांना आपली सही करण्याची इच्छा असेल त्यांच्या सहया त्यावर घेईल.

(२) त्यानंतर मतदान केद्राध्यक्ष अशारीतीने सही केलेली कागदाची मोहर मतपेटीत त्यासाठी ठेवण्यात आलेल्या जागेवर लावील आणि त्यांनतर मतपत्रिका पेटीत टाकण्यासाठी असलेली फट उघडी राहील अशारीतीने ती मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील.

(३) मतपेटी सुरक्षित करण्याकरिता वापरलेल्या अशारीतीने लावण्यात येतील की, ती पेटी बंद केल्यानंतर, त्या मोहोरा तोडल्याशिवाय ती पेटी उघडणे शक्य होणार नाही.

(४) मतपेटी सुरक्षित करण्याकरिता कागदाची मोहोर वापरण्याची आवश्यकता नसेल तेव्हा मतपत्रिका टाकण्यासाठी असलेली फट उघडी राहील अशा रीतीने मतदान केंद्राध्यक्ष मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील आणि हजर असलेल्या मतदान प्रतिनिधींची तशी इच्छा असेल तर, त्यांना आपल्या मोहोरा लावण्याची परवानगी देईल.

(५) मतदान केंद्रात वापरण्यात येणा-या प्रत्येक मतपेटीला आतील व बाहेरील अशा दोन्ही बाजूंना पुढील गोष्टी नमूद केलेल्या खूणचिठ्ठया लावण्यात येतील :

(अ) निर्वाचक गणाचे नाव आणि कोणताही असल्यास अनुक्रमांक

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नाव

(क) मतपेटीचा अनुक्रमांक (हा मतदानाच्या शेवटी केवळ मतपेटीच्या बाहेरील खूण चिठ्ठीवर लिहावा)

(ड) मतदानाची तारीख

(६) मतदान सुरु होण्याच्या निकटपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधींना व उपस्थित असलेल्या इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे व पोटनियम (५) मध्ये उल्लेखिलेली खुणचिठ्ठया लावल्या असल्याचे प्रत्यक्ष दाखविल.

(७) त्यानंतर मतपेटी बंद करण्यात येईल, मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांच्या पूर्णपणे दृष्टीसमोर राहील अशा ठिकाणी ठेवण्यात येईल.

**३६-अ. स्त्री-मतदारांसाठी सोयी :-**

(१) जेव्हा एखादे मतदान क्षेत्र स्त्रिया व पुरुष या दोन्ही मतदानांकरीता असेल तेव्हा, त्यांना वेगवेगळया गटांनी आळीपाळीने मतदान केंद्रात प्रवेश देण्यात येईल असा निदेश मतदान केंद्राध्यक्षास देता येईल.

(२) निर्वाचन अधिकाऱ्यास किंवा मतदान केंद्राध्यक्षास, एखाद्या मतदान केंद्रात स्त्री-मतदारांना सहाय्य करण्यासाठी व तसेच सर्वसाधारणपणे स्त्री-मतदाराच्या संबंधातील मतदान घेण्यात केंद्राध्यक्षास सहाय्य करण्यासाठी आणि विशेषतः तशी आवश्यकता निर्माण झाल्यास, कोणत्याही स्त्री-मतदाराची झडती घेण्यास मदत करण्यासाठी सहायक म्हणून काम करण्यास एखाद्या स्त्रीची नेमणूक करता येईल.

**३७. मतदारांची ओळख पटविणे :-**

(१) मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रात मतदारांची ओळख पटविण्याच्या कामात मदत करण्यासाठी किंवा मतदान घेण्यात त्यास इतर प्रकारे सहाय्य करण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती कामावर लावता येतील.

(२) ज्यावेळी मतदान केंद्रात एखाद्या मतदार प्रवेश करील त्यावेळी मतदान केंद्राध्यक्ष किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी त्या मतदाराचे नाव व इतर तपशील,

मतदारांच्या यादीतील संबंधित नोंदीशी ताडून पाहील व त्यानंतर त्या मतदाराचा अनुक्रमांक, नाव व इतर तपशिल पुकारील.

(३) मतपत्रिका मिळण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क ठरविताना यथास्थिती मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी, ज्याच्यासंबंधी एखादी नोंद केलेली आहे तो मतदार म्हणजेच ही व्यक्ती होय त्याची खात्री झाली असल्यास, अशा मतदारांच्या यादीतील त्या नोंदीमधील केवळ लेखन दोषाकडे किंवा छपाईच्या चुकांकडे दुर्लक्ष करील.

**३७-अ. निवडणुकीच्या कामावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सवलती :-**

(१) जी व्यक्ती निवडणुकीच्या कामावर असल्याबद्दलचे नमुना ५-क मधील प्रमाणपत्र मतदान केंद्रावर सादर करते आणि ज्या मतदान केंद्रावर, मतदान करण्याचा तिला हक्क आहे, त्या केंद्रापेक्षा हे मतदान केंद्र वेगळे असले तरी ती, याच केंद्रावर मतपत्रिका देण्यास सांगते अशा कोणत्याही व्यक्तीस नियम ३७ मधील तरतूदी लागू होणार नाहीत.

(२) अशाप्रकारचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष

(अ) ते दाखल करणाऱ्या व्यक्तीची त्यावर सही घेईल,

(ब) प्रमाणपत्रावर उल्लेख केल्याप्रमाणे त्या व्यक्तीचे नाव व मतदारांच्या यादीतील अनुक्रमांक, मतदारांच्या यादीच्या चिन्हांकित प्रतीच्या शेवटी नोंदवील, आणि

(क) त्या मतदान केंद्रावर मतदाराचा हक्क असलेल्या सर्वसामान्य मतदाराला जशी मतपत्रिका देण्यात येते त्याचप्रमाणे यालाही मतपत्रिका देईल आणि मतदान करण्यास परवानगी देईल.

**३८. ओळखीबाबत आक्षेप :-**

(१) आपण अमुक एक मतदार आहोत असा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या ओळखीबाबत, कोणत्याही मतदान प्रतिनिधीस अशा प्रत्येक आक्षेपाबद्दल रोख २ रुपयांची रक्कम मतदान केंद्राध्यक्षाकडे प्रथम अनामत ठेवून आक्षेप घेता येईल.

(२) अशाप्रकारे रक्कम अनामत ठेवल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्ष-

(अ) ज्याच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला आहे अशा व्यक्तीस तोतयेगिरीबद्दल होणाऱ्या शिक्षेसंबंधी ताकीद देईल

(ब) मतदारांच्या यादीतील संबंधित नोंद पूर्णपणे वाचून दाखवील आणि त्या नोंदीत उल्लेखिलेली व्यक्ती तिच आहे काय असे विचारील

(क) नमुना ७ मधील आक्षेप घेण्यात आलेल्या मतांच्या यादीत त्याचे नाव व पत्ता नमूद करील आणि

(ड) उक्त यादीत त्यास आपली सही करण्यास भाग पाडील.

(३) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष आक्षेपाबद्दल संक्षिप्त चौकशी करील व त्यास त्या कारणाकरीता-

(अ) आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस आपला आक्षेप सिध्द करण्याकरिता पुरावा दाखल करण्यास व जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस, आपली ओळख शाबित करण्यासाठी पुरावा दाखल करण्यास फर्माविता येईल

(ब) जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस तिची ओळख पटवून घेण्यासाठी आवश्यक असे कोणतेही प्रश्न विचारता येतील आणि शपथेवर त्यांची उत्तरे देण्यात त्यास भाग पाडता येईल,

(क) ज्याच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस व साक्षीपुरावा देण्यास पुढे येणाऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीस शपथ देता येईल.

(४) चौकशी केल्यानंतर आक्षेप सिध्द झाला नाही असे मतदान केंद्राध्यक्षास वाटले तर, तो आक्षेप घेतलेल्या व्यक्तीस मत देण्याची परवानगी देईल आणि आक्षेप सिध्द झाला आहे असे त्यास वाटले तर, तो जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस मत देण्यास प्रतिबंध करील.

(५) घेतलेला आक्षेप हा क्षुल्लक स्वरुपाचा आहे किंवा तो सद्‌भावनापूर्वक घेतलेला नाही असे मतदान केंद्राध्यक्षाचे मत असेल तर, तो पोट-नियम(१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्याचा निदेश देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत चौकशी संपल्यानंतर तो ती रक्कम आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस परत करील.

**३८-अ. तोतयेगिरीविरुध्द संरक्षक उपाययोजना :-**

(१) मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने ज्या मतदाराची ओळख पटल्याबद्दल मतदान केंद्राध्यक्षाची किंवा यथास्थिती मतदान अधिकाऱ्याची खात्री होईल असा प्रत्येक मतदार आपली डावी तर्जनी मतदान केंद्राध्यक्षास किंवा मतदान अधिकाऱ्यास तपासून देईल आणि तीवर पक्क्या शाईची खूण करु देईल.

(२) जर कोणताही मतदार पोट-नियम (१) अनुसार आपली डावी तर्जनी तपासून देण्यास किंवा तिच्यावर खूण करु देण्यास नकार देईल किंवा त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर व अशी खूण अगोदरच करण्यात आलेली असेल किंवा ती शाईची खूण नाहिशी करण्याच्या उद्देशाने तो कोणतीही गोष्ट करील तर, त्यास कोणतीही मतपत्रिका दिली जाणार नाही किंवा मत देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(३) मतदाराच्या डाव्या तर्जनीसंबंधीचा या नियमातील कोणताही निर्देश हा, जर मतदाराला डावी तर्जनी नसेल तर, त्या बाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजण्यात येईल आणि त्यास डाव्या हाताची सर्वच बोटे नसतील तर त्या बाबतीत तो, त्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीसंबंधीचा किंवा इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजण्यात येईल आणि त्यास दोन्ही हाताची बोटे नसतील तर त्याबाबतीत, तो त्याच्या असलेल्या डाव्या किंवा उजव्या बाहूच्या अग्रभागासंबंधीचा निर्देश आहे असे समजण्यात येईल.

**३९.मतपत्रिका देणे:-**

(१) मतदानास सुरुवात होण्यासाठी निश्‍चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(२) मतदान बंद होण्याच्या वेळी मतदान केंद्रावर जे मतदार हजर असतील अशा मतदारांव्यतिरिक्त इतर कोणत्याही मतदारास मतदान बंद करण्याकरीता निश्‍चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही. अशा (हजर असणाऱ्या) मतदारांना मतदानाची वेळ संपल्यानंतरही मते नोंदण्यास परवानगी देण्यात येईल.

(३) मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी, अशा मतपत्रिकेच्या मागील बाजूस आणि तिच्या स्थळप्रतीच्या (काऊंटर फॉईलच्या ) मागे जिल्हाधिकारी निदेश देईल असा विशिष्ट खुणेचा ठसा उमटविण्यात येईल आणि अशी प्रत्येक मतपत्रिका मतदारास दिली जाण्यापूर्वी, तिच्या मागील बाजूवर मतदान केंद्राध्यक्ष आपली संपूर्ण सही करील.

(४) मतपत्रिका मतदारास देताना मतदान अधिकारी -

(अ) तिच्या स्थळप्रतीवर मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रतीमध्ये नोंदलेला मतदाराचा अनुक्रमांक नमूद करील

(ब) उक्त स्थळप्रतीवर त्या मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा अंगठयाचा ठसा घेईल आणि

(क) मतदारास मतपत्रिका देण्यात आली आहे हे दर्शविण्यासाठी मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रतीमध्ये मतदाराच्या नावावर खूण करील परंतु तो त्या मतदाराला देण्यात आलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक तेथे नमूद करणार नाही.

परंतु, मतदाराने मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्याची स्वाक्षरी केल्याशिवाय अथवा अंगठयाचा ठसा उमटविल्याशिवाय त्याला मतपत्रिका देण्यात येणार नाही.

**४०.मतदानाची कार्यपध्दती :-**

(१) मतपत्रिका मिळाल्यानंतर मतदार ताबडतोब,-

(अ) मतदान कक्षाकडे जाईल,

(ब) तेथे मतपत्रिकेवर, त्याला त्या उमेदवारास मत देण्याची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा निशाणीजवळ त्या कारणाकरिता पुरविण्यात आलेल्या साधनाने खूण करील

(क) आपले मत गुप्त राखण्यासाठी मतपत्रिकेची घडी करील

(ड) आवश्यकता आल्यास, मतपत्रिकेवरील विशिष्ट खूण (Distinguishing mark) मतदान केंद्राध्यक्षास दाखवील

(इ) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील आणि

(फ) मतदान केंद्रातून निघून जाईल.

(२) प्रत्येक मतदार अवाजवी विलंब न लावता मत देईल.

(३) दुसरा मतदार मतदान कक्षामध्ये असताना कोणत्याही मतदारास तेथे प्रवेश देण्यात येणार नाही.

(४)मतदान केंद्राध्यक्षाने ताकीद दिल्यानंतर जर मतपत्रिका दिलेल्या मतदाराने पोट-नियम (१) मध्ये निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्याचे नाकारल्यास, मतदान केंद्राध्यक्षाला

किंवा केंद्राध्यक्षाच्या निदेशानुसार मतदान अधिकाऱ्याला, मतदाराने त्यावर त्याचे मत नोंदवले असल्यास किंवा नसल्यास त्याला दिलेली मतपत्रिका परत घेता येईल.

(५) मतदान केंद्राध्यक्ष, मतपत्रिका परत घेतल्यानंतर तिच्या मागच्या बाजूस रद्द केलेली मतदान कार्यपध्दतीचा भंग केलेली असे शब्द लिहून त्या शब्दांखाली आपली स्वाक्षरी करील.

(६) ज्यावर रद्द केलेल्या - मतदान कार्यपध्दतीचा भंग केलेली असे शब्द नमूद केलेले आहेत त्या सर्व मतपत्रिका मतपत्रिका-मतदान कार्यपध्दतीचा भंग केलेल्या असे शब्द असलेल्या एका स्वतंत्र पाकिटात / लिफाफयात ठेवण्यात येतील.

(७) पोट-कलम (४) अन्वये ज्याच्याकडून मतपत्रिका परत घेण्यात आली असेल असा मतदार इतर कोणत्याही शिक्षेस पात्र झाला असता त्या शिक्षेस हानी न पोचवता अशा मतपत्रिकेवर नोंदण्यात आलेले मत मतमोजणीत मोजण्यात येणार नाही.

**४१.अंध किंवा अपंग मतदारांची मतनोंदणी :-**

(१) अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगत्वामुळे एखादा मतदार मतपत्रिकेवरील निशाणी ओळखण्यास किंवा मदतीशिवाय त्यावर खूण करण्यास असमर्थ असेल तर, याबद्दल मतदान केंद्राध्यक्ष मतपत्रिकेवर त्याच्या वतीने आणि त्याच्या इच्छेनुसार मत नोंदविण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, मत न दिसेल अशारीतीने मतपत्रिकेची घडी घालण्यासाठी आणि ती मतपेटीत टाकण्यासाठी एकवीस वर्षांहून कमी वयाच्या नसणाऱ्या एखाद्या सोबत्याला त्याच्याबरोबर मतदान कक्षाकडे नेण्यासाठी मतदारास परवानगी देईल.

परंतु, त्याचदिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर एकापेक्षा अधिक मतदारांसाठी सोबती म्हणून कोणत्याही व्यक्तिस परवानगी देण्यात येणार नाही

परंतु, आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही व्यक्तीस मतदाराचा सोबती म्हणून कार्य करण्यास तिने मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत तो गुप्त राखील आणि त्याच दिवशी तिने कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्याही मतदारासाठी सोबती म्हणून काम केलेले नाही असे जाहीर करण्यास तिला भाग पाडण्यात येईल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष, या नियमाखाली सर्व प्रकरणांची नोंद नमुना ७-अ मध्ये ठेवील.

**४२.खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका:-**

(१) ज्या कोणत्याही मतदाराने अनवधानाने आपली मतपत्रिका अशा रितीने वापरली असेल की, मतपत्रिका म्हणून तिचा सोयीस्कर रीतीने वापर करणे शक्य नसेल तर, त्या मतदाराने, ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाकडे परत केल्यावर वा आपल्या अनवधानामुळे ही गोष्ट घडली अशी त्याची खात्री पटविल्यावर, त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि अशारितीने परत केलेल्या मतपत्रिकेवर खराब झालेली-रद्द झालेली मतपत्रिका असा शेरा मतदान केंद्राध्यक्षाकडून लिहिण्यात येईल.

(२) मतपत्रिका मिळाल्यानंतर एखाद्या मतदाराने तिचा उपयोग न करण्याचे ठरविले तर, तो तो मतदान केंद्राध्यक्षाकडे परत करील आणि अशारीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर परत केलेली - रद्द केलेली अशा शेरा मतदान केंद्राध्यक्षाकडून लिहिण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-नियम (२) अन्वये रद्द केलेल्या सर्व मतपत्रिका एका वेगळया पाकिटात ठेवण्यात येतील.

**४३.प्रदत्त मते :-**

(१) आपण अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करुन गेल्यावर जर आणखी एक व्यक्ती आपणच तो अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर, तिला मतदान केंद्राध्यक्षाने तिची ओळख पटविण्याबद्दल विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर तिला या नियमाच्या पुढील उपबंधास अधीन राहून इतर कोणत्याही मतदाराप्रमाणेच त्याचरीतीने मतपत्रिकेवर (यात यापुढे जिचा प्रदत्त मतपत्रिका असा करण्यात आला आहे ) खूण करण्याचा हक्क असेल.

(२) अशी प्रत्येक व्यक्ती प्रदत्त मतपत्रिका तीला देण्यात येण्यापूर्वी, नमुना ८ मधील यादीतील तिच्यासंबंधीच्या नोंदीसमोर आपल्या नावाची सही करील.

(३) प्रदत्त मतपत्रिका ही मतदान केंद्रावर मागण्यात येणाऱ्या इतर मतपत्रिकांसारखीच असेल, मात्र-

(अ) ती मतदान केंद्रावर वापरण्याकरीता देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठ्यातील अनुक्रमांकानुसार शेवटची मतपत्रिका असेल आणि

(ब) अशा मतपत्रिकेच्या मागे आणि तिच्या स्थळप्रतीच्या मागे मतदान केंद्राध्यक्ष त्याच्या स्वत:च्या हस्ताक्षरात प्रदत्त मतपत्रिका अशा शब्दांत पृष्ठांकन करुन आपली सही करील.

(४) मतदानाच्या कक्षात प्रदत्त मतपत्रिकेवर खूण केल्यानंतर व तिची घडी केल्यानंतर मतदार ती मतपेटीत न टाकता ती मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल, मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्या कारणाकरीता खास राखून ठेवलेल्या एका पाकीटात ठेवील.

**४४.मतदान बंद करणे :-**

(१) नियम १३ अन्वये, त्या बाबतीत ठरविण्यात आलेल्या वेळी मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्र बंद करील व त्यानंतर तो कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना आपली मतें देण्यास परवानगी देण्यात येईल

(२) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे उपस्थित होता किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

**४५.मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद करणे :-**

(१) मतदान बंद झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर, मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधीच्या समक्ष मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्याकरीता मतपेटीला कोणतीही यांत्रिक कळ नसेल तेव्हा, तो ती फट मोहोरबंद करील व हजर असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधीस देखील मोहोर लावण्याची परवानगी देईल.

(२) त्यानंतर मतपेटी मोहोरबंद करुन ती सुरक्षित करण्यात येईल.

(३) पहिली मतपेटी भरल्यामुळे जेव्हा दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करणे आवश्यक झाले असेल तेव्हा, दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी, पोटनियम (१) व (२) यात तरतूद केल्याप्रमाणे पहिली मतपेटी बंद करण्यात येईल, मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित केली जाईल.

**४६.मतपत्रिकांचा हिशोबः-**

(१) मतदान संपल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्ष नमुना ९ मध्ये मतपत्रिकांचा हिशोब तयार करीत व तो एका वेगळया पाकिटात ठेवून त्यावर मतपत्रिकांचा हिशोब असे शब्द लिहिल.

(२) मतपत्रिकांच्या हिशोबाच्या केलेल्या नोंदीची सत्य प्रत घेण्याची ज्या मतदान प्रतिनिधीची इच्छा असेल त्यास ती घेण्यास मतदान केंद्राध्यक्ष परवानगी देईल आणि सत्य प्रत म्हणून ती साक्षांकित करील.

**४७.इतर पाकीटे मोहोरबंद करणे :-**

(१) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर पुढील निरनिराळी पाकिटे तयार करील :

(अ) खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत

(अअ) वापरलेल्या मतपत्रिकांच्या स्थळप्रती

(ब) नियम ३९, पोट-नियम (३) अन्वये मतदान केंद्राध्यक्षाने संपूर्ण सही केलेल्या परंतु मतदारांना न दिलेल्या मतपत्रिका

(बब) मतदारांना देण्यात न आलेल्या कोणत्याही इतर मतपत्रिका

(क) रद्द केलेल्या मतपत्रिका

(ड) प्रदत्त मतपत्रिका असलेले पाकीट व प्रदत्त मतपत्रिकांची यादी

(इ) आक्षेप घेतलेल्या मतांची यादी आणि

(फ) निर्वाचन अधिकाऱ्याच्या निदेशानुसार मोहोरबंद पाकिटात ठेवावयाची इतर कागदपत्रे

(२) असे प्रत्येक पाकीट मतदान केंद्राध्यक्षाची आणि हजर असलेल्या मतदान प्रतिनिधीपैकी ज्यांची त्यावर आपली मोहोर लावण्याची इच्छा असेल त्यांची मोहोर लावून मोहोरबंद करण्यात येईल.

**४८.मतपेटया, पाकिटे वगैरे निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठविणे :-**

(१) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष निर्वाचन अधिकारी निदेश देईल अशाठिकाणी पुढील वस्तु निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा स्वाधीन करण्याची व्यवस्था करील.

(अ) मतपेटया

(ब) मतपत्रिकांचा हिशोब

(क) नियम ५१ मध्ये उल्लेखिलेली मोहोरबंद केलेली पाकिटे आणि

(ड) मतदानाच्या वेळी वापरलेली इतर सर्व कागदपत्रे

(२) मतमोजणी सुरु होईपर्यन्त निर्वाचन अधिकारी सर्व मतपेटया पाकिटे व इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित परिवहनासाठी व त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करील.

**४९.आणीबाणीच्या परिस्थितीत मतदान तहकूब करणेः-**

(१) एखाद्या निवडणुकीच्या वेळी कोणत्याही मतदान केंद्रावरील मतदानाच्या कामकाजात कोणत्याही दंग्यामुळे किंवा उघड हिंसात्मक कृत्यामुळे व्यत्यय किंवा अडथळा आल्यास किंवा एखाद्या निवडणुकीच्या वेळी कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर कोणत्याही पुरेशा कारणामुळे मतदान केंद्रात मतदान घेणे शक्य न झाल्यास अशा मतदान केंद्राचा निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष नंतर ठरविण्यात येईल, अशा तारखेपर्यन्त मतदान तहकूब करण्यात आल्याचे जाहीर करील आणि मतदान केंद्राध्यक्ष, अशारीतीने मतदान तहकूब केले असेल तर, तो संबंधित निर्वाचन अधिकाऱ्यास त्याबाबत ताबडतोब कळवील.

(२) पोटनियम (१) अन्वये जेव्हा जेव्हा मतदान तहकूब करण्यात येईल, तेव्हा तेव्हा निर्वाचन अधिकारी, ती परिस्थिती ताबडतोब राज्य निवडणूक आयोगाला आणि जिल्हाधिकाऱ्याला कळवील आणि त्यानंतर राज्य निवडणूक आयुक्तांचे काही निर्देश असल्यास, त्यास अधीन राहून, जिल्हाधिकारी शक्य तितक्या लवकर, ज्या दिवशी मतदान पुन्हा सुरु होईल तो दिवस ठरवील आणि मतदान कोणत्या मतदान केंद्रात व कोणत्या वेळाच्या दरम्यान घेण्यात येईल ते ठरवील. अशारीतीने तहकूब करण्यात आलेले मतदान पूर्ण होईपर्यन्त निर्वाचन अधिकारी अशा निवडणुकीत मतांची मोजणी करण्यात नाही.

(३) वर सांगितलेल्या प्रत्येक बाबतीत जिल्हाधिकारी पोट-नियम (२) अन्वये ठरविलेली मतदानाची तारीख, ठिकाण व वेळ नियम १३ मध्ये नमूद केलेल्या रीतीने प्रसिध्द करील आणि मूळ मतदानास लागू असलेले या नियमाचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह या नियमान्वये घेतलेल्या नवीन मतदानासही लागू होतील.

**५०.मतदान तहकूब केल्यानंतरची कार्यपध्दती :-**

(१) नियम ४९ अन्वये एखाद्या मतदान केंद्रातील मतदान तहकूब झाले असेल तर, नियम १३ मध्ये अन्वये त्याबाबतीत ठरविलेल्या वेळी मतदान बंद झाले होते असे समजून नियम ४५ ते ४८ (दोन्ही धरुन) यांचे उपबंध व्यवहार्य असेल तितपत लागू होतील.

(२) तहकूब केलेले मतदान नियम ४९, पोट-नियम (२) अन्वये पुन्हा सुरु होईल तेव्हा अशा रीतीने तहकूब करण्यात आलेल्या मतदानात ज्यांनी अगोदर मतदान केले असेल अशा मतदारांना पुन्हा मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(३) ज्या मतदान केंद्रात असे तहकूब केलेले मतदान घेण्यात येईल त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास निर्वाचन अधिकारी खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत असलेले मोहोरबंद पाकीट व एक नवीन मतपेटया पुरवील.

(४) मतदान केंद्राध्यक्ष मोहोरबंद पाकीट उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या समक्ष उघडील आणि तहकुबीनंतरच्या मतदानाच्या वेळी ज्यांना मतपत्रिका देण्यात येतील अशा मतदारांच्या नावावर खुणा करण्यासाठी, खूण केलेली मतदारांच्या यादीची प्रत वापरील. तथापि, त्यावर त्यांचे अनुक्रमांक नमूद करणार नाही.

(५) नियम ३१ ते ४८ (दोन्ही धरुन ) यांचे उपबंध हे ज्याप्रमाणे अशा रितीने मतदान तहकूब करण्यापूर्वीच्या मतदानाच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणेच ते तहकूब केलेले मतदान पुन्हा घेण्याच्या संबंधात लागू होतील.

**५१.मतपेटयांचा नाश, वगैरे झाल्याच्या बाबतीत नव्याने मतदान घेणे :-**

(१) कोणत्याही निवडणुकीत जर-

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कोणतीही मतपेटी मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा निर्वाचन अधिकाऱ्याच्या ताब्यातून अवैधरित्या काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ झाली, किंवा मतदान केंद्रावरील मतदानाचा निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तिच्यात ढवळाढवळ करण्यात आली, किंवा

(ब) मतदान केंद्रावरील कार्यपध्दतीत, जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाहय गोष्ट घडली असेल,

तर निर्वाचन अधिकारी ती गोष्ट ताबडतोब राज्य निवडणूक आयोगास आणि जिल्हाधिकाऱ्यास ताबडतोब कळवील.

(२) त्यानंतर, राज्य निवडणूक आयोगाचे काही आदेश असल्यास त्यास अधीन राहून जिल्हाधिकारी सर्व महत्वाची परिस्थिती विचारात घेऊन, एकतर-

(अ) त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे जाहीर करील, त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्यासाठी एखादा दिवस ठरवील व वेळ ठरवील आणि अशारीतीने ठरविलेला दिवस व ठरविलेली वेळ त्यास योग्य वाटेल अशारितीने जाहीर करील, किंवा

(ब) त्या मतदान केंद्रावरील नवीन मतदानाच्या निकालाच्या निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे अनिष्ट परिणाम होणार नाही किंवा कार्यपध्दतीतील चूक किंवा नियमबाहयता महत्वाची नाही अशी त्याची खात्री झाली तर, निवडणुकीच्या पुढील कामकाजाकरिता व निवडणूक पूर्ण करण्याकरिता त्यास योग्य वाटतील असे निर्देश निर्वाचन अधिकाऱ्यास देईल.

(३) या अधिनियमाचे व त्याअन्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांचे उपबंध, ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणे ते अशा प्रत्येक नव्याने घेतलेल्या मतदानासही लागू होतील.

## प्रकरण ८
## मतमोजणी

**५२.मतमोजणीवरील पर्यवेक्षक:-**

ज्यात मतदान घेण्यात आले असेल अशा प्रत्येक निवडणुकीत, निर्वाचन अधिकारी किंवा त्याच्या देखरेखीखाली व त्याच्या निदेशानुसार मतमोजणी करण्यात येईल आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस व मतमोजणी प्रतिनिधीस मतमोजणीच्या वेळी हजर उपस्थित राहण्याचा हक्क असेल.

**५३. मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेत प्रवेशः-**

(१) निर्वाचन अधिकारी, पुढील व्यक्तीखेरीज इतर सर्व व्यक्तींना मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेतून बाहेर काढील.

(अ) मतमोजणीच्या कामात त्यास सहाय्य कण्यासाठी तो नेमील अशा ( मतमोजणी पर्यवेक्षक आणि मतमोजणी सहायक म्हणून ओळखल्या जावयाच्या व्यक्ती,

(ब) जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती,

(क) निवडणुकीच्या संबंधात कामावर उपस्थित असलेले लोकसेवक, आणि

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी

(२) जिला उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या वतीने निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात कामावर लावले असेल किंवा जी इतर प्रकारे उमेदवाराकरीता निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधाने काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस पोटनियम (१) खंड (अ) अन्वये नेमण्यात येणार नाही.

(३) कोणत्या मतमोजणी प्रतिनिधीने मतमोजणीच्या विशिष्ट टेबलाकडे किंवा मतमोजणीच्या टेबलांच्या गटाकडे लक्ष ठेवावे ते निर्वाचन अधिकारी ठरवील.

(४) जी व्यक्ती मतमोजणी चालू असताना, स्वतः गैरवर्तन करील किंवा निर्वाचन अधिकाऱ्याचे वैध निदेश पाळण्यात कसूर करील अशा कोणत्याही व्यक्तीस, जेथे मतमोजणीचे काम चालू असेल अशा जागेतून निर्वाचन अधिकाऱ्याकडून किंवा कामावर असलेल्या कोणत्याही पोलिस अधिका-याकडून किंवा निर्वाचन अधिकाऱ्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून बाहेर घालविण्यात येईल.

**५४. मतदानाची गुप्तता राखणेः-**

निर्वाचन अधिकारी मतमोजणीस सुरुवात करण्यापूर्वी, तो तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तींना कलम ५८ आणि कलम ३२ यांच्या तरतूदी वाचून दाखवील.

**५५. मतपेटयांची छानन व त्या उघडणे :-**

(१) निर्वाचन अधिकारी, एकाचवेळी, एकापेक्षा अधिक केंद्रावर वापरलेली किंपर वापरलेल्या मतपेटी किंवा मतपेटया उघडील आणि अशी मतपेटी किंवा मतपेटया यांमध्ये आढळून आलेल्या एकूण मतपत्रिकांची मोजणी करील.

(२) मतमोजणीच्या टेबलावर कोणतीही मतपेटी उघडण्यापूर्वी त्या टेबलाजवळ उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना कागदाची मोहोर किंवा तिला लावली असेल अशी इतर मोहोर तपासू देण्यात येईल किंवा ती जशीच्या तशी असल्याबद्दल खात्री करुन देण्यात येईल.

(३) वस्तुतः कोणत्याही मतपेटीत ढवळाढवळ करण्यात आलेली नाही याविषयी निर्वाचन अधिकारी स्वतःची खात्री करुन घेईल.

(४) कोणत्याही मतपेटीमध्ये खरोखर अनधिकृतपणे फिरवाफिरव (Tampering) केली असल्याबद्दल निर्वाचन अधिकाऱ्याची खात्री झाली तर तो त्या मतपेटीत असणाऱ्या

मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राबाबत नियम ५१ मध्ये घालून दिलेली कार्यपध्दती अनुसरील.

**५६. मतमोजणीः-**

(१) प्रत्येक मतपेटीमधून काढलेल्या मतपत्रिकाचे सोयीस्कर गठ्ठ्यात लावण्यात येतील आणि त्यांची छाननी करण्यात येईल.

(२) निर्वाचन अधिकारी पुढील कारणास्तव मतपत्रिका नाकारीलः-

(अ) ज्यामुळे मतदान ओळखता येईल अशी खूण किंवा मजकूर मतपत्रिकेवर असेल किंवा

(ब) त्यावर अजिबात कोणतेही चिन्ह नसेल किंवा मत दर्शविण्यासाठी त्यावर मतपत्रिकेच्या पृष्ठभागावर एका उमेदवाराच्या निशाणीवर किंवा निशाणीजवळ नव्हे तर, अन्य ठिकाणी चिन्ह केलेले असेल किंवा त्या प्रयोजनासाठी पुरवलेल्या साधनानिशी नव्हेतर, अन्यथा केलेले असे चिन्ह असेल किंवा

(क) ज्यास जितकी मते देण्याचा हक्क आहे त्या मतांपेक्षा अधिक मते मतदाराने त्यावर नमूद केली असतील,

(ड) मत दर्शविणारी तिच्यावर केलेली खूण ही कोणत्या उमेदवारास मत दिले आहे याविषयी शंका उत्पन्न होईल अशारीतीने करण्यात आली असेल, किंवा

(इ) ती मतपत्रिका बनावट असेल किंवा

(फ) ती खरीखुरी मतपत्रिका असल्याबद्दल निश्चितपणे सिध्द करता येणार नाही इतक्या प्रमाणात तिची नासधूस झाली असेल किंवा ती खराब झाली असेल किंवा

(ग) एखाद्या मतपत्रिकेवर, त्या मतदान केंद्रात वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक किंवा यथास्थिती त्यांचा नमुना याहून वेगळा अनुक्रमांक असेल किंवा ती वेगळया नमुन्याची असेल किंवा

(ह) त्यावर नियम ३९, पोट-नियम(३) च्या उपबंधानुसार पाहिजे असलेले विशिष्ट चिन्ह (Distinguishing mark) आणि सही ही दोन्ही नसतील तर.

परंतु-

(एक) खंड (ग) किंवा (ह) मध्ये निर्दिष्ट केलेला असा कोणताही दोष मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही चुकीमुळे किंवा त्याने एखादी गोष्ट न केल्यामुळे उत्पन्न झाला आहे अशी निर्वाचन अधिकाऱ्याची खात्री झाली तर, असा दोष आहे केवळ याच कारणावरुन ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही.

(दोन) ज्याप्रकारे मतपत्रिकेवर खूण केली असेल त्यावरुन विशिष्ट उमेदवारालाच मत देण्याचा इरादा स्पष्टपणे दिसून येत असेल तर, मत दर्शविणारी खूण अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा खूण केली आहे, केवळ हयाच कारणास्तव ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही.

(३) पोट-नियम (२) अन्वये कोणतीही मतपत्रिका नाकारण्यापूर्वी, निर्वाचन अधिकारी, उपस्थित असलेल्या प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस, मतपत्रिकेची तपासणी करण्याची वाजवी संधी

देईल. परंतु, त्यास ती मतपत्रिका किंवा इतर कोणत्याही मतपत्रिकेस हाताळण्याची परवानगी देणार नाही.

(४) निर्वाचन अधिकारी, तो बाद करील अशा प्रत्येक मतपत्रिकेवर बाद हा शब्द आणि संक्षिप्त स्वरुपात ती बाद करण्याची कारणे स्वतःच्या अक्षरात किंवा रबरी शिक्क्याने पृष्ठांकीत करील आणि अशा पृष्ठांकनावर आद्याक्षरी करील.

(५) हया नियमान्वये नाकारण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयात बांधून ठेवण्यात येतील.

(६) या नियमान्वये बाद करण्यात आलेली प्रत्येक मतपत्रिका ही, एक वैध मत म्हणून मोजली जाईल :

परंतु, प्रदत्त मतपत्रिका समाविष्ट असणारे कोणतेही पाकीट उघडण्यात येणार नाही आणि अशी कोणतीही मतपत्रिका मोजण्यात येणार नाही.

(७) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेटयांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर,-

(अ) मतमोजणी अधिकरी, निर्वाचन अधिकाऱ्याने सही केली असेल अशा नमुना ९ मधील मतमोजणी निकाल, नमुना दोनमध्ये भरील आणि त्यावर सही करील

(ब) निर्वाचन अधिकारी नमुना १० मधील निकालपत्रांत नोंदी करील व तपशिल जाहीर करील.

**५७. वापरलेल्या मतपत्रिका मोहोरबंद करणे :-**

प्रत्येक उमेदवाराच्या वैध मतपत्रिका आणि बाद मतपत्रिका त्यानंतर वेगवेगळे गठ्ठयात बांधण्यात येतील आणि काही गठ्ठयाचे एक पुडके करण्यात येईल व त्यावर निर्वाचन अधिकाऱ्याची मोहोर लावण्यात येईल आणि उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी यांच्यापैकी, जे त्यावर आपला मोहोर लावू इच्छीत असतील ते उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी यांची मोहोर हया पुडक्यावर लावण्यात येईल आणि अशा रीतीने मोहोरबंद करण्यात आलेल्या पुडक्यांवर खालील तपशिल नमूद करण्यात येईल :-

(अ) निर्वाचक गणाचे नांव आणि

(ब) मतमोजणीची तारीख

**५७-अ. मतमोजणी अखंड चालू ठेवणे:-**

निर्वाचनअधिकारी व्यवहार्य असेल तेथवर, मतमोजणी अखंडपणे चालू ठेवील आणि मतमोजणी स्थगित ठेवावी लागेल अशा कोणत्याही मध्यंतराच्या वेळी मतपत्रिका, पुडकी व निवडणुकीशी संबंधीत कागदपत्रे स्वतःच्या आणि जे आपली मोहोर लावू इच्छीत असतील अशा उमेदवारांच्या किंवा निवडणूक किंवा मतमोजणी प्रतिनिधीच्या मोहोरानिशी मोहोरबंद करुन ठेवील आणि अशा मध्यंतराच्या वेळी त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी सावधगिरी बाळगण्याची व्यवस्था करील.

**५७-ब. फेरमतदानानंतर मतमोजणी पुन्हा चालू करणे :-**

(१) नियम ५१ अन्वये पुन्हा मतदान घेण्यात आले तर, निर्वाचन अधिकारी, ते मतदान पूर्ण झाल्यानंतर मतमोजणीसाठी त्याने जी तारीख व वेळ आणि जे ठिकाण ठरवले असेल व ज्यासंबंधीची नोटीस उमेदवारांना व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना देण्यात आली असेल अशा तारखेस, वेळी व अशा ठिकाणी, मतमोजणी पुन्हा सुरु करील.

(२) नियम ५६ व ५७ चे उपबंध हे, शक्य असेल तेथवर, अशापुढील मतमोजणीस लागू असतील.

**५८. फेरमतमोजणी:-**

(१) मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निर्वाचन अधिकारी नमुना १० मधील निकालपत्रात, प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील व ती जाहीर करील.

(२) अशारीतीने जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, पूर्वी मोजणी करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्याबद्दल निर्वाचन अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल व त्या अर्जात, त्याने ज्या मुद्दांवरुन अशा फेरमोजणीसाठी अर्ज केला असेल ते मुद्दे नमूद करावेत.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निर्वाचन अधिकारी त्याबाबतीत निर्णय देईल आणि त्यास असा अर्ज, संपूर्णतः किंवा अंशतः मंजूर करता येईल किंवा जर त्यास उक्त अर्ज क्षुल्लक किंवा गैरवाजवी असल्याचे दिसून येईल तर, तो संपूर्णतः नाकारण्यात येईल.

(४) पोट-नियम (३) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक निर्णय हा लेखी राहील आणि त्यामध्ये त्याबद्दलची कारणे नमूद करण्यात येतील.

(५) पोटनियम (३) अन्वये जर निर्वाचन अधिकारी असा अर्ज संपूर्णतः किंवा अंशतः मंजूर करण्याचे ठरवील तर, तो-

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची पुन्हा मोजणी करील

(ब) अशा फेरमोजणीनंतर आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यन्त, नमुना १० मधील निकालपत्रात सुधारणा करील आणि

(क) अशारीतीने त्याने केलेल्या सुधारणा जाहीर करील.

(६) पोटनियम (१) किंवा पोटनियम ५) अन्वये प्रत्येक उमेदवारास मिळालेली एकूण मते जाहीर करण्यात आल्यानंतर निर्वाचन अधिकारी नमुना १० मधील निकालपत्र पूर्ण करुन त्यावर सही करील आणि त्यानंतर फेरमोजणीसाठी कोणताही अर्ज दाखल करुन घेण्यात येणार नाही :

परंतु, मतमोजणी पूर्ण होण्याचे वेळी उपस्थित असलेले उमेदवार व निवडणूक प्रतिनिधी यांना पोटनियम (२) अन्वये देण्यात आलेला अधिकार अंमलात आणण्यासाठी वाजवी संधी देण्यात येईपर्यन्त, मतमोजणीचे काम पूर्ण झाल्यावर या पोट-नियमान्वये कोणतीही उपाययोजना करण्यात येणार नाही.

**५९. निवडणुकीचा निकाल जाहीर करणे :-**

निर्वाचन अधिकारी त्यानंतर कलम २६ आणि कलम ५८, पोटकलम (२) चे उपबंध, जर ते विशिष्ट बाबतीत लागू असतील तर, आणि ते ज्या मर्यादेपर्यन्त लागू असतील तेथवर, त्यास

अधीन राहून आणि जर त्याअन्वये जिल्हाधिकाऱ्याने त्याप्रमाणे प्राधिकृत केले असेल तर, ज्या उमेदवारास सर्वात अधिक वैध मते मिळाली असतील तर तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील आणि नमुना ११ मधील निवडणूक विवरणपत्र पूर्ण करील व ते प्रमाणित करील आणि त्याच्या सही केलेल्या प्रती, शक्य तितक्या लवकर जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

## प्रकरण ९
## संकीर्ण

**६०. सदस्यांची नावे प्रसिध्द करणे :-**

(१) नियम २९ अन्वये प्रतिज्ञापत्र मिळाल्यानंतर किंवा नियम ५९ अन्वये निवडणूक विवरणपत्रे मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी कलम ५७, पोटकलम (३) खंड (अ) च्या परंतुकाच्या तरतुदीस अधीन राहून पंचायत समितीवर निवडून आलेल्या सर्व सदस्यांची नावे, त्यांचा कायम पत्त्यासह आणि जेथून ते निवडून आले असतील त्या निर्वाचक गणांच्या नावासह आपल्या सूचना फलकावर किंवा त्याच्या कार्यालयातील,जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या कार्यालयातील व जिल्हयातील मामलतदार, तहसीलदार, महालकरी किंवा यथास्थिती नायब तहसिलदार यांच्या कार्यालयातील कोणत्याही मुख्य ठिकाणी नोटीस लावून प्रसिध्द करील.

(ब) पोटनियम (२) (२) वगळले.

**६०-अ. पंचायत समितीतील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडणूकः-**

(१) जर एखादी व्यक्ती पंचायत समितीमधील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडून आली असेल तर, पोटनियम (२) अन्वये विहित केलेल्या मुदतीत त्याने जिल्हाधिकाऱ्यास उद्देशून स्वतःच्या सहीने लिहिलेला एक जागेखेरीज सर्व जागांचा राजीनामा दिला नाही तर, सर्व जागा रिकाम्या होतील.

(२) एखाद्या व्यक्तीस पंचायत समितीतील एका जागेखेरीज सर्व जागांचा राजीनाम ज्या मुदतीत देता येईल ती मुदत पुढीलप्रमाणे राहील :-

(अ) नियम ५९ अन्वये निर्वाचन अधिकाऱ्याने निवडणुकीचा निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून सात दिवस किंवा,

(ब) तिच्या निवडणुकीच्या तारखा वेगवेगळया जागांच्या संबंधात वेगवेगळया असतील त्याबाबतीत, नंतरच्या निवडणुकीच्या बाबतीतील निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून सात दिवस.

(३) वगळले

**६०-ब. उमेदवाराची अनामत रक्कम परत करणे किंवा ती जप्त करणे :-**

(१) नियम १६-अ खाली ठेवलेली अनामत रक्कम, एकतर ती ठेवणाऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या वैध प्रतिनिधीस परत करण्यात येईल किंवा नियमाच्या उपबंधानुसार राज्य शासनाकडे जप्त करण्यात येईल.

(२) या नियमांत यानंतर उल्लेख केलेल्या प्रकरणातील असेल ते खेरीजकरुन, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर व्यवहार्य असेल तितक्या लवकर, अनामत रक्कम परत करण्यात येईल.

(३) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत उमेदवाराचे नाव दाखविण्यात आलेले नसेल किंवा तो मतदान सुरु होण्यापूर्वी मरण पावला तर, यादी प्रसिध्द झाल्यानंतर किंवा यथास्थिती त्याच्या मृत्यूनंतर, व्यवहार्य असेल तेवढया लवकर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

(४) पोटनियम (३) च्या उपबंधास अधीन राहून, ज्याबाबतीत मतदान घेण्यात आले आहे अशा निवडणुकीत उमेदवार निवडून आला नाही आणि त्याला मिळालेल्या वैध मतांची संख्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक अष्टमांशापेक्षा अधिक होत नसेल तर, अनामत रक्कम जप्त होईल.

**६१. निवडणुकीसंबंधीची कागदपत्रांची अभिरक्षा :-**

निर्वाचन अधिकारी, नियम ४७ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे आणि निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे अभिरक्षेत ठेवील.

**६२. निवडणुकविषयक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणीः-**

निर्वाचन अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असताना (१) (१)(अ) त्यांना जोडलेल्या स्थळप्रतींसह, न वापरलेल्या मतपत्रिकांची पुडकी

(२) वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची पाकिटे, मग ती वैध असोत, प्रदत्त असोत किंवा नाकारण्यात आलेली असोत.

(बब) वापरलेल्या मतपत्रिकांच्या स्थळप्रतींची पुडकी

(क) मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रतींची पकिटे,

उघडण्यात येणार नाहीत आणि सक्षम न्यायालय किंवा प्राधिकारी यांच्या आदेशावाचून कोणत्याही व्यक्तीकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून उक्त पाकिटातील मजकुराची तपासणी करण्यात येणार नाही किंवा ती त्याजपुढे सादर करण्यात येणार नाही.

(२) निवडणुकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे लोकांना पाहणीसाठी खुली असतील.

**६३. निवडणुकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणेः-**

(१) नियम ६२, पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे एक वर्षेपर्यन्त ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती, राज्य निवडणूक आयोगाने किंवा सक्षम न्यायालयाने किंवा प्राधिकाऱ्याने तद्विरुध्द कोणताही निदेश दिला असल्यास त्यास अधिन राहून, नष्ट करण्यात येतील.

(२) निवडणुकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे ही, ती ज्या निर्वाचक गणासंबंधी असतील त्या निर्वाचक गणासाठी पुढील सार्वत्रिक निवडणूक संपेपर्यन्त राखून ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती, राज्य निवडणूक आयोगाने किंवा सक्षम न्यायालयाने किंवा प्राधिकाऱ्याने तद्विरुध्द कोणताही निदेश दिला असल्यास, त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.

**६४. तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागाः-**

पंचायत समितीवर निवडून आलेल्या सदस्याची जागा रिकामी होईल किंवा रिकामी झाल्याचे जाहीर करण्यात येईल किंवा त्याची पंचायत समितीवर झालेली निवडणूक रद्द करण्यात येईल तेव्हा राज्य निवडणूक आयोग ती जागा भरण्यासाठी पोट-निवडणूक घेण्यासाठी सोयीस्करपणे शक्य असेल तितक्या लवकर, तारीख ठरवील आणि त्यानंतर या नियमांचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह, तदनुसार लागू होतील.

**(नमुना १)**

(नियम १३ पहा)

---------------------------जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालय, क्रमांक----------

महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ यांचा नियम १३, पोटनियम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मी,---------------------- जिल्हाधिकारी------------ याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचक गणांकडून (यात यापुढे यांचा निर्देश संबंधित निर्वाचक गण असा करण्यात आलेला आहे) केल्या जाणाऱ्या निवडणुकीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे :

(अ) संबंधित निर्वाचक गणांसमोर, उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळा ही संबंधित निर्वाचक गणांच्या संबंधातील नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी अखेरची तारीख व वेळ असेल.

(ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ संबंधित निर्वाचक गणाच्या बाबतीत नामनिर्देशनपत्राच्या छाननीसाठीची तारीख व वेळ असेल

(क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची आणि त्याची छाननी करण्याची ठिकाणे असतील.

(ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख ही-------, पंचायत समितीसाठी व्यक्तीची निवडणुक ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारख असेल,

(इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ६ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली वेळ ही, ज्या वेळी मतदान घेण्यात येईल त्या वेळ असेल.

(फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ ही, मतमोजणीची तारीख व वेळ असेल

(ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ८ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, मतमोजणीची ठिकाणे असतील.

# अनुसूची

| निर्वाचक गणांची नांव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रे सादर करणे व त्यांची छाननी करणे यासाठीची जागा | आवश्यकता असल्यास ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणीची ठिकाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| इत्यादी | | | | | | | |

दिनांक---------
ठिकाणी--------

जिल्हाधिकारी

**नमुना २**

(नियम १५ पहा )

**नामनिर्देशनपत्राचा नमुना**

(---------------- पंचायत समितीची निवडणूक)

---

(सूचकाने भरावयाचे)

मी, याद्वारे ---------------------------------------- मतदार विभागातील ---------- निर्वाचक गणासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी ------------- यांस उमेदवार म्हणून, नामनिर्दिष्ट करीत आहे.

मतदार विभागाचे नाव -------------------------------------------------

निर्वाचक गणाचे नांव -------------------------------------------------

उमेदवाराचे नांव -------------------------------------------------

वडिलांचे / पतीचे नांव -------------------------------------------------

वय -------------------------------------------------

उमेदवाराचा निवासस्थानाचा डाकेचा संपूर्ण पत्ता -------------------------------------------------

राखीव जागा असणा-या निर्वाचक गणाच्या बाबतीत उमेदवार ज्या जातीचा, जमातीचा किंवा वर्गाचा असेल त्या जातीचा, जमातीचा किंवा वर्गाचा तपशील नमूद करावा. -------------------------------------------------

ज्या निर्वाचक गणामध्ये मतदारांच्या यादीत मतदार म्हणून उमेदवाराचे नाव नोंदवण्यात आले असेल त्या निर्वाचक गणाचे नांव -------------------------------------------------
-------------------------------------------------

वर नमूद केलेल्या ज्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत मतदार म्हणून उमेदवाराचे नांव नोदवण्यात आले असेल त्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक -------------------------------------------------

सूचकाचे नाव --------------------------------------

निर्वाचक गणाच्या मतदारांच्या यादीतील सूचकाचा अनुक्रमांक -------------------------------------------------

दिनांक--------------

सूचकाची सही किंवा अंगठयाचा ठसा

**उमेदवाराने करुन द्यावयाचे प्रतिज्ञापन**

मी, याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, निवडून आल्यास सदस्य मी ---------- पंचायत समितीचा सदस्य म्हणून काम करण्यास तयार आहे.

दिनांक--------------- उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

**अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या किंवा नागरिकांच्या मागासवर्गाच्या उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र**

मी, याद्वारे, जाहीर करतो की, मी----------------------------------------------------

(एक) महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती असलेल्या------- जातीचा / जमातीचा सदस्य आहे.

(दोन) शासनाने नागरिकांचा मागासवर्ग म्हणून जाहीर केलेल्या------------------------ या वर्गाचा सदस्य आहे.

दिनांक उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

**पक्ष/आघाडी/मोर्चा यांनी उभ्या केलेल्या उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र**

मी, याद्वारे जाहीर करतो की, ----------------- हा राजकीय पक्ष/आघाडी/मोर्चा यांनी मला ही निवडणूक लढविण्याकरिता उभे केले आहे.

दिनांक उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक-------------------

हे नामनिर्देशनपत्र उमेदवाराने, उमेदवाराच्या सूचकाने, दिनांक------------------- रोजी, वाजता, --------------- येथील माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले.

दिनांक ------ निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा किंवा ते नाकारण्याचा निर्वाचन अधिकाऱ्याचा निर्णय**

मी, महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ याच्या नियम १९ अनुसार, नामनिर्देशनपत्राची तपासणी केली आहे आणि पुढील निर्णय देत आहे.

दिनांक निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नामनिर्देशनपत्र मिळाल्याची पावती आणि छाननीची नोटीस**
(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाची )

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ----------
------------ गटातील ----------- मतदार विभागातील ---------- निर्वाचक गणामधून होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार असलेल्या ------------ यांचे नामनिर्देशनपत्र (दिनांक)-------------- रोजी ----- (वेळ) वाजता उमेदवाराने / उमेदवाराच्या सूचकाने ---------- येथील माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले.

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याचे काम (दिनांक) ------------ रोजी ------------- (वेळ) वाजता ------------ (ठिकाणी) येथे हाती घेण्यात येईल.

दिनांक निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नमुना २ अ**
(नियम १५ अ पहा )
**राजकीय पक्ष / आघाडी / मोर्चा यांनी उभे केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत व्यक्तींची माहिती कळवणे.**

प्रति,
१. जिल्हाधिकारी
२. निर्वाचन अधिकारी, मतदार विभाग, -------- पंचायत समिती ------------ जिल्हा

विषय - पंचायत समिती--------- जिल्हा --------ची सार्वत्रिक निवडणूक
निवडणूक चिन्हांचे वाटप-उमेदवारांची नावे कळविण्यासाठी व्यक्तींना प्राधिकृत करणे

महोदय,

मी याद्वारे कळवितो की, वर निर्देश केलेल्या निवडणुकीसाठी पक्षाने उभे करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी खालील व्यक्तीस / व्यक्तींना महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय / राज्यस्तरीय असणाऱ्या पक्षाने/आघाडीने / मोर्चाने प्राधिकृत केले आहे.

| सूचना पाठविण्यासाठी केलेल्या व्यक्तीचे नांव | पक्ष/आघाडी/मोर्चा मध्ये धारण केलेले पद | पंचायत समितीच्या ज्या गटासाठी व निर्वाचक गणासाठी प्राधिकृत केले आहे तो गटव निर्वाचक गण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | |

२. अशा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या/व्यक्तींच्या स्वाक्षरीचा नमुना पुढीलप्रमाणे आहे.

(१) श्री. ---------------------- यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -----------------------

(दोन) ----------------------

(तीन) ----------------------

(२) श्री. --------------------- यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -----------------------

(दोन) ----------------------

(तीन) ----------------------

(३) श्री. --------------------- यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -----------------------

(दोन) ----------------------

(तीन) ----------------------

ठिकाण -----------

तारीख

आपला विश्वासू

अध्यक्ष / सचिव
पक्षाचे / आघाडीचे /मोर्चाचे नाव
(पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर )

**नमुना २ ब**

(नियम १५-अ पहा )

**राजकीय पक्षाने / आघाडीने / मोर्चाने उभे केलेल्या उमेदवारांच्या नावाबाबतची नोटीस**

१. जिल्हाधिकारी -----------------------------

२. निर्वाचन अधिकारी ----------------- निर्वाचक गण, ---------- पंचायत समिती, जिल्हा ------------------

विषयः- पंचायत समिती ----- जिल्हा यांच्या सार्वत्रिक निवडणूका/उमेदवार उभे करणे

महोदय,

मी याद्वारे सूचना देतो की, ------- पंचायत समिती ----------- जिल्हयामधील निर्वाचक गणांच्या आगामी निवडणुकीसाठी ------------ पक्षाने / आघाडीने / मोर्चाने खालील व्यक्तींना प्रत्येक निर्वाचक गणासमोर नमूद करण्यात आल्यानुसार त्यांचा उमेदवार म्हणून उभे केले आहे.

| निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराचे नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नांव | मान्यताप्राप्त उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| (जर मान्यताप्राप्त उमेदवारांचे नामनिर्देशन छाननीच्या वेळी अवैध ठरले किंवा त्यांने निवडणूकीतून माघार घेतली तर बदली उमेदवाराचे नाव | बदली उमेदवाराच्या वडिलांचे/ पतीचे नाव | बदली उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |
| | | |

ठिकाण : आपला विश्वासू,

तारीख :

( पक्षाच्या/आघाडीच्या/मोर्चाच्या प्राधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी )

विशेष सूचना- हे पत्र उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यन्त निर्वाचन अधिकारी यांच्याकडे पोचविले पाहिजे.

( पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर )

**नमुना २-क**

(नियम १९-अ पहा )

**नोटीस**

मी, याद्वारे अशी नोटीस देतो की, श्री/श्रीमती ----------------- यांचे नामनिर्देशनपत्र स्विकारल्याबद्दलच्या / नामनिर्देशनपत्र नाकारल्याबद्दलच्या माझ्या निर्णयाविरुध्द ------------- गटातील -------------- मतदार विभागातील--------- निर्वाचक गणामधून होणाऱ्या निवडणूकीसाठी उमेदवार असलेल्या श्री/श्रीमती-------------- यांनी, महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ याच्या नियम १९-अ, पोटनियम (२) अन्वये-------- च्या जिल्हा न्यायालयाकडे अपील केले आहे.

मी. याद्वारे आणखी असे अधिसूचित करतो की, उक्त अपीलाच्या सुनावणी ------------- जिल्हा न्यायालयापुढे या नोटीशीच्या प्रसिध्दीच्या दिनांकानंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे ------------ रोजी सुरु होईल.

अपीलविषयक विनंती-अर्जाची प्रत निर्वाचन अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे आणि ती उत्तरवादीस ( किंवा उत्तरवादींना ) निर्वाचन अधिका-याच्या कार्यालयातून घेता येईल.

दिनांक ----------------

ठिकाण ---------------

निर्वाचन अधिकारी

ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली आहेत त्या उमेदवारांच्या यादीच्या प्रतींसह प्रत जिल्हा न्यायालय --------- यांजकडे पाठविण्यात आली.

**नमुना ३**

(नियम २१ पहा)

**निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी**

--------------- गटाच्या -------------- मतदार विभागातील निर्वाचक गणामधून होणाऱ्या पंचायत समितीची निवडणूक

| अनु. क्रमांक | उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा पत्ता | उमेदवारास नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| इत्यादी | | | |

दिनांक ----------------

ठिकाण ---------------

निर्वाचन अधिकारी

**नमुना ४**

(नियम २३ पहा)

**निवडणूक प्रतिनिधीच्या नेमणुकीचा नमुना**

मी, ----------------------------- राहणार -------------------------- गटातील---------- मतदार विभागातून ------------ या निर्वाचक गणाच्या-------- पंचायत समितीसाठी दिनांक --------------------, १९ रोजी होणाऱ्या निवडणुकीतील उमेदवार, असून याद्वारे श्री. --------------- राहणार ------------------------ यांची, वरील निवडणुकीसाठी माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून आजच्या दिनांकापासून नेमणूक करीत आहे.

दिनांक

उमेदवाराची सही

वरील नेमणुकीस माझी मान्यता आहे.

निवडणूक प्रतिनिधीची सही

**नमुना ५**

(नियम २४ व २५ पहा )

**मतदान / मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक**

------------------------ गटाच्या -------------- मतदार विभागातील---------- या निर्वाचक गणाच्या ------------ पंचायत समितीची निवडणूक

निर्वाचन अधिकारी ------------------------------------निर्वाचक गण

मतकेंद्राध्यक्ष ----------------------------------------मतदान केंद्र यांस,

मी, ---------------------- प्रस्तुत निवडणूक लढविणारा उमेदवार / प्रस्तुत निवडणूक लढविणारा उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी असून याद्वारे, अशी नोटीस देतो की, ------------------- यांची मतदान केंद्रात, मतदान मतमोजणी ठरविण्यात आलेल्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी मतदान/ मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली आहे.

असा मतदान / मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे मी मान्य करीत आहे.

दिनांक मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची सही

**मतदान /मतमोजणी प्रतिनिधीने निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष यांच्यापुढे ही सही करुन द्यावयाचे प्रतिज्ञापन.**

मी, याद्वारे,असे प्रतिज्ञापन करतो की, ---------- निर्वाचक गणाच्या ------------ मतदार विभागातून ---------- होणाऱ्या प्रस्तुत निवडणूकीत मी संबंधित अधिनियम किंवा त्यान्वये केलेले नियम याद्वारे जी गोष्ट निषिध्द ठरविण्यात आली असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

दिनांक मतमोजणी प्रतिनिधीची / मतदान प्रतिनिधीची सही

माझ्या समक्ष सही केली.

दिनांक निर्वाचन अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष

**नमुना ५-अ**

(नियम २९ पहा)

**बिनविरोध निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याचा नमुना**

------- मतदार विभागातील च्या निर्वाचक गणामधून होणारी--- पंचायत समितीची निवडणूक,१९

महाराष्ट्र, पंचायत समित्या निवडणूक, १९६२ च्या नियम २९ च्या उपबंधानुसार मी असे जाहीर करतो की, (नांव) ----------------------, राहणार पत्ता ---------------- हा, निवडणूक लढविणारे एकमेव उमेदवार असल्यामुळे वरील निर्वाचक गणातील जागा भरण्यासाठी तो यथोचितरित्या निवडून आले आहेत.

दिनांक ----------------

ठिकाण ---------------

निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नमुना ५ ब**

**निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठी अर्ज**

(नियम ३१-अ पहा)

प्रति,

निर्वाचन अधिकारी

------------ मतदार गण

महोदय,

पंचायत समितीच्या आगामी निवडणुकीच्या वेळी ------------- मतदार गणात मी जातीने मतदान करु इच्छितो.

या मतदार गणात -------------- (मतदार केंद्राचा क्रमांक व नाव) या ठिकाणी माझी निवडणूक कामासाठी नेमणूक करण्यात आली आहे. परंतु ---------------- मतदार गणातील मतदार यादीच्या भाग क्रमांक ----------मधील अनुक्रमांक ------------ वर माझे नाव आहे.

मतदानाच्या दिवशी ज्या मतदान केंद्रावर मी काम करीत असेन, त्या मतदान केंद्रावर मतदान करणे शक्य व्हावे म्हणून नमुना ५-क मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र मला देण्यात यावे, ही विनंती.

प्रमाणपत्र खालील पत्त्यावर मला पाठविण्यात यावे :-

-------------

-------------

------------

आपला

ठिकाण ----------

दिनांक -----------

**नमुना ५ क**

**निवडणूक कार्य प्रमाणपत्र**

(नियम ३१-अ आणि ३७-अ पहा)

प्रमाणित करण्यात येत आहे की, --------------- हे ------------ मतदार गणतील मतदार असून, त्यांचा मतदार यादीतील क्रमांक ------------ आहे आणि ते निवडणुकीच्या कामावर असल्यामुळे, ज्या मतदार केंद्रावर मतदार करण्याचा त्यांना हक्क आहे, त्या मतदान केंद्रावर त्यांना मतदार करणे शक्य होणार नाही. म्हणून, मतदानाच्या दिवशी ते उक्त मतदार गणातील ज्या मतदान केंद्रावर काम करीत असतील, त्या केंद्रावर मतदान करण्यासाठी त्यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

ठिकाण ------------

दिनांक ------------

सही

निर्वाचन अधिकारी

मोहोर

**नमुना ६**

**(नियम ३३ पहा)**

**स्थळप्रतीचा नमुना व मतपत्रिकेचा नमुना**

क्रमांक---------------------

--------------------------------- पंचायत समिति

--------------------------------- निर्वाचक गण

----------------------------------------मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक -------

मतदाराची सही / अंगठयाचा ठसा

---

क्रमांक ---------------

--------------------------------- पंचायत समिती

--------------------------------- निर्वाचक गण

---------------------------------------------------------------------------------
उमेदवाराचे नांव                                        नेमून देण्यात आलेली निशाणी
(१)                                                              (२)
---------------------------------------------------------------------------------
--------------                              ---------------------
--------------                              ---------------------
--------------                              ---------------------
---------------------------------------------------------------------------------

**नमुना ७**
**आक्षेपीत मतांची यादी**

-------------- गटातील --------------- मतदार विभागतील -------------- निर्वाचक गणातील ---------------- पंचायत समितीची निवडणूक

मतदान केंद्र ---------------
मतदान केंद्राचा, कोणताही असल्यास ------------

| अनु क्रमांक | मतदाराचे नाव | मतदाराच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठयाचा ठसा व त्याचा पत्ता | ओळख पटवून देणारा असल्यास त्याचे नाव | आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीचे नाव | अनामत ठेवलेली रक्कम | प्रत्येक बाबतीतील मतदान केंद्राध्यक्षाने दिलेला आदेश | अनामत रक्कम परत देण्यात येईल तेव्हा आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीची अनामत रककम मिळाल्या बद्दलची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

दिनांक

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना ७-अ**

(नियम ४१ (२) पहा )

**अंध व अपंग मतदारांची यादी**

---------------------------- मतदार विभागातील, ----------------------निर्वाचन गणातील --------------- पंचायत समितीची निवडणूक

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ----------

| भाग क्रमांक, मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराचे संपूर्ण नाव | सोबत्याचे संपूर्ण नाव | सोबत्याचा पत्ता | सोबत्याची सही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

दिनांक ---------------- मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना ८**

**प्रदत्त मतांची यादी**

(नियम ४३ पहा )

----------- गटातील ------- मतदार विभागातील --------------- निर्वाचक गण

मतदान केंद्र ------------

मतदान केंद्राचा, कोणताही असल्यास, क्रमांक------

| नोंदीचा अनु क्रमांक | मतदाराचे नाव | मतदारांच्या यादी-तील मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराचा पत्ता | प्रदत्त मतपत्रिकेचा अनुक्रमांक | ज्याने पूर्वीच मतदान केले असेल अशा व्यक्तीस दिलेल्या मतपत्रिकेचा क्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठयाचा ठसा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

दिनांक ------------ मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना ९**

(नियम ४६ व ५६ (७) पहा )

**भाग एक- मतपत्रिकांच्या हिशोबाचा नमुना**

--------------------- मतदार विभागातील ------------------- निर्वाचक गणामधील ---------

पंचायत समितीची निवडणूक

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव ------------

| | अनुक्रमांक पासून | एकूण संख्या पर्यन्त |
|---|---|---|
| १. मिळालेल्या मतपत्रिका<br>२. न वापरलेल्या मतपत्रिका<br>(म्हणजे मतदाराला न दिलेल्या मतपत्रिका-)<br>(अ) मतदान केंद्राध्यक्षाच्या सही असलेल्या<br>(ब) मतदान केंद्राध्यक्षाची सही नसलेल्या<br>एकूण-(अ)+(ब)<br>३. मतदान केंद्रावर वापरलेल्या मतपत्रिका<br>(१-२ =३)<br>४. मतदान केंद्रावर वापरलेल्या परंतु मतपेटीमध्ये न टाकलेल्या मतपत्रिका-<br>(अ) नियम ४० अन्वये मतदान कार्यपध्दतीचा भंग केल्यामुळे रद्द करण्यात आलेल्या मतपत्रिका<br>(ब) इतर कारणांसाठी रद्द करण्यात आलेल्या मतपत्रिका<br>(क) प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरण्यात आलेल्या मतपत्रिका<br>एकूण-(अ + ब + क )<br>५. मतपेटीमध्ये आढळून आलेल्या मतपत्रिका<br>( ३ - ४ = ५ ) | | |

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**भाग दोन - प्रारंभिक मतमोजणीचा निकाल**

| अनुक्रमांक | उमेदवाराचे नांव | मिळालेल्या वैध मतांची संख्या |
|---|---|---|
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>इत्यादी | | |
| दोन : बाद करण्यात आलेल्या मतपत्रिका | | |
| तीन : एकूण | | |
| वरील बाब क्रमांक तीन समोर दर्शविलेल्या मतपत्रिकांच्या एकूण संख्येशी भाग एकच्या क्रमांक ५ समोर दर्शविलेल्या एकूण संख्येचा मेळ बसतो किंवा या दोन्ही आकडयांमध्ये काही विसंगती आढळून आहे किंवा कसे | | |

ठिकाण ----------------

दिनांक ---------------- मतमोजणी पर्यवेक्षकाची सही

ठिकाण ----------------

दिनांक ---------------- निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नमुना १०**

(नियम ५६ (७) पहा)

**निकालपत्राचा नमुना**

---------------------------- मतदार विभागातील ----------निर्वाचक गणामधील -----------
पंचायत समितीची निवडणूक

<table>
<tr><td rowspan="2">मतदान केंद्राचा अनु क्रमांक</td><td colspan="6">उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांची संख्या</td><td>एकूण वेध मते</td><td>नाकारलेल्या मतांची संख्या</td><td>एकूण</td><td>प्रदत्त मतांची संख्या</td></tr>
<tr><td>अ</td><td>ब</td><td>क</td><td>ड</td><td>ई</td><td>फ</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>१<br>२<br>३<br>-------<br>-------<br>इत्यादी</td><td colspan="10"></td></tr>
<tr><td colspan="11">मतदान केंद्रावर नोदविण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या</td></tr>
</table>

ठिकाण ----------------

दिनांक ----------------                                        निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**नमुना ११**

(नियम ५९ पहा)

**निवडणूक विवरणपत्रकाचा नमुना**

-------------- मतदार विभागातील ---------निर्वाचक गणातील ---------------------पंचायत समितीची निवडणूक, १९------------

| उमेदवाराचे नाव | उमेदवारास मिळालेल्या वैध मतांची संख्या |
|---|---|
| १ | |
| २ | |
| ३ | |
| ४ | |
| वगैरे | |
| मिळालेल्या वैध मतांची एकूण संख्या ------- | |
| अवैध मतांची एकूण संख्या ------- | |
| प्रदत्त मतांची एकूण संख्या ------- | |

मी जाहीर करतो की,----------------------

नाव ---------------------------------------------------------------------------------

पत्ता ---------------------------------------------------------------------------------

हे रितसर निवडून आले आहेत.

दिनांक निर्वाचन अधिकाऱ्याची सही